# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

----------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६ / आषाढ २, १९४८ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

----------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ६३**

----------------------------------------

### उरण (जि.रायगड) येथील भारत मुंबई कंटेनर टर्मिनलला जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१) * ८८२९ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथे भारत मुंबई कंटेनर टर्मिनल या चौथ्या बंदराशी जोडणारा सुमारे ७०० मीटर लांबीचा ६८ कोटी रुपये एवढी रक्कम खर्च करुन बांधण्यात आलेल्या दुपदरी उड्डाणपुलाजवळील जोडरस्त्याचा काही भाग पुल उभारणीनंतर आठ ते दहा महिन्यांत अचानक खचला असून कंटेनर वाहतुकीसाठी धोकादायक झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण NHAI (National Highways Authority of India) कडे सोपविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाच्या दर्जाबाबत तसेच संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाबाबत साशंकता निर्माण झाली असून एवढी मोठी रक्कम खर्च करुनही पुलाचे बांधकाम इतक्या कमी कालावधीत खचल्याने पुलाच्या निकृष्ट दर्जाच्या कामासाठी जबाबदार असणाऱ्या कंत्राटदार आणि संबंधित देखरेख करणाऱ्या अभियंत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच या संपूर्ण मार्गावरील इतर पुलांच्या बांधकामांचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) भारत मुंबई कंटेनर टर्मिनल या चौथ्या बंदराशी जोडणाऱ्या उड्डाणपूलाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. सदर उड्डाणपूलाचे काम मार्च, २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आले असून प्रकल्पाचा दोष दायित्व कालावधी डिसेंबर, २०२५ अखेर पूर्ण झाला आहे.

जासखार पूलाची मुख्य संरचना सुस्थितीत असून उड्डाणपूलाच्या अप्रोच स्लॅब भागामध्ये काही भाग खचल्याचे (settlement) आढळून आले आहे.

पूलाच्या settlement ची बाब निदर्शनास आल्यानंतर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत संबंधित कंत्राटदारांस तात्काळ त्रुटी दुरुस्तीबाबत नोटीस बजावण्यात आली आहे. सद्य:स्थितीत वाहतूक विभागाकडून रस्ता बंद करण्याची आवश्यक परवानगी प्राप्त करून संबंधित कंत्राटदारांमार्फत दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

(३) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अहवालानुसार पूलाच्या बांधकामावेळी वेळोवेळी गुणनियंत्रण चाचण्या घेण्यात आल्या होत्या. तसेच इतर पूलांचे स्ट्रक्चरल ऑडीट एप्रील २०२६ मध्ये करण्यात आले असून त्यामध्ये settlement आढळून आलेले नाही.

(४) वाहतूक पोलीस विभागाकडून वाहतूक बंद / वळविण्याबाबत आवश्यक परवानगी प्राप्त होण्यास झालेल्या विलंबामुळे दुरुस्तीच्या कामांच्या अंमलबजावणीस विलंब झाला.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरातील हडको एन-११ येथे रुग्णालय उभारणीबाबत

**(२) * ८७६४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात या उददेशाने हडको एन-११ या परिसरात स्मार्ट सिटी अंतर्गत मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याचे काम महानगरपालिकेने सन २०२२ मध्ये हाती घेतले असून सदर इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मार्ट सिटीच्या निधीतून ९ कोटी रुपये एवढी रक्कम खर्च करुन रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून त्यात ६२ खाटांचा समावेश करुन रुग्णालयात रुग्णांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील असे महानगरपालिकेने आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयाची इमारत तयार आहे परंतु, वैद्यकीय उपकरणे व डॉक्टर, कर्मचारी व इतर मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत काहीही कार्यवाही न झाल्याने, रुग्णालय कार्यान्वित झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयास तात्काळ वैद्यकीय उपकरणे, साहित्य व मनुष्यबळ उपलब्ध करून रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशतः खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अहवालानुसार शहरातील सदर रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सदर रुग्णालय कार्यान्वित करण्याकरीता वैद्यकीय उपकरणे, साहित्य व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत रुपये १०.९९ कोटी निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक २५/०३/२०२५ व दिनांक २०/११/२०२५ च्या पत्रान्वये सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यानुषंगाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: पुणे व पिंपरी-चिंचवड येथील शिवभोजन केंद्रांना व्यावसायिक गॅसचा पुरवठा करण्याबाबत

**(३) * ९५२९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे, पिंपरी-चिंचवडसह अन्य शिवभोजन केंद्रे अनेक महिने अनुदान न मिळाल्यामुळे तसेच व्यावसायिक गॅसच्या उपलब्धतेत कमतरता असल्याने बंद होण्याच्या मार्गावर असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, युध्दसदृश परिस्थितीमुळे व्यावसायिक गॅसचा पुरवठा विस्कळीत झाल्याने अनेक ठिकाणी चुलीवर स्वयंपाक करावा लागत असून पिंपरी-चिंचवडमध्ये २०-२५ केंद्रांपैकी फक्त ५ केंद्रे सुरू आहेत तसेच पुण्यातही अनेक केंद्रे बंद झाली असून, केंद्र चालकांना अनुदान मिळाले नसल्याने त्यांचेकडून किराणा व गॅस एजन्सीचे पैसे थकित राहिल्याने पुरवठादारांनी माल देणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे आणि पिंपरी चिंचवडसह राज्यातील सुरु असलेल्या सर्व शिवभोजन केंद्रांना मुबलक प्रमाणात गॅस पुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच शिवभोजन केंद्राचे थकीत अनुदान तात्काळ वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे. परंतु, आता सर्व अनुदान देण्यात आले आहे. तसेच, चालू आर्थिक वर्षात रु. १२० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

(२) सद्यस्थितीतील युद्धसदृश परिस्थितीमुळे काही प्रमाणात व्यावसायिक गॅसचा पुरवठा विस्कळीत झाला होता. त्यामुळे काही ठिकाणी चुलीवर स्वयंपाक करून शिव- भोजन केंद्र सुरु ठेवण्यात आली होती.

सद्यस्थितीत पुणे शहर व पिंपरी चिंचवडमध्ये एकुण ४२ शिवभोजन केंद्रे आहेत.

(३) केंद्र शासनामार्फत वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार शासनाने व्यावसायिक गॅस सिलेंडरचे वितरण करण्याकरीता दिनांक १०/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्राधान्यक्षेत्रे निश्चित केली आहेत. त्यानुसार राज्यशासन व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविण्यात येणारी अनुदान प्राप्त होणारी उपहारगृहे यांनाही व्यावसायिक गॅसचा पुरवठा करण्यात येतो.

शिवभोजन केंद्राकरीता खालीलप्रमाणे निधी मंजूर करण्यात आला आहे.

| सन | मुळ तरतुद | पुरवणी मागणी द्वारे प्राप्त निधी | खर्च |
|---|---|---|---|
| २०२५-२६ | ७० कोटी | १५०.०० कोटी | २१६.९९ कोटी |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील किंग एडवर्ड मेमोरियल (केईएम) रुग्णालयाच्या नामांतराच्या प्रस्तावाला स्थगिती देण्याबाबत

**(४) * ८६४२ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रतिष्ठित आणि १०० वर्षांचा वारसा असलेल्या किंग एडवर्ड मेमोरियल (केईएम) रुग्णालयाचे नाव बदलून 'कौशल्य श्रेष्ठ एकलव्य स्मारक रुग्णालय' (Ekalavya Memorial Hospital) करण्याचा प्रस्ताव मा.कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री महोदयांनी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किंग एडवर्ड मेमोरियल (केईएम) हे रुग्णालय गत १०० वर्षांपासून रुग्णांच्या सेवेत असून, त्याचा एक ऐतिहासिक वारसा असून नाव बदलल्याने हा वारसा पुसला जाईल या कारणास्तव विविध स्तरातून तसेच विविध संघटनांकडून सदरहू प्रस्तावाला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केईएम रुग्णालयातील निवासी डॉक्टरांची संघटना (MARD - Maharashtra Association of Resident Doctors) देखील या नामांतराच्या विरोधात असून जगभरात 'केईएम' याच नावाने रुग्णालय प्रसिध्द असल्याने ते नाव कायम ठेवावे अशी मागणी त्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील केईएम रुग्णालयाची ऐतिहासिक ओळख टिकवून ठेवण्यासाठी नामांतराच्या प्रस्तावाला तातडीने स्थगिती देण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) केईएम रुग्णालयाचे नाव बदलाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे विनंती प्राप्त झाली असून त्यांचेकडून याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) * ८७८० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे,**

**डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे, ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.विक्रांत पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील कूपर रुग्णालयात आयसीयू (ICU) बेड किंवा वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे रुग्णांचे मृत्यू झाल्याच्या घटना घडल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केईएम, नायर, लोकमान्य टिळक व कूपर रुग्णालय तसेच अन्य १६ उपनगरीय रुग्णालयांतील अतिदक्षता विभागात फक्त ७९७ खाटा तसेच एमआयसीयू च्या केवळ २५ खाटा उपलब्ध असल्याने एकाच बेडवर दोन रुग्णांवर तसेच जमिनीवर गादी टाकून रुग्णांवर उपचार केले जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख आणि १६ उपनगरीय रुग्णालयांमध्ये विशेषत: अतिदक्षता विभागामध्ये खाटांची कमतरता भासत असल्याने गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांना तातडीच्या उपाययोजना करणेबाबत समर्थन संस्थेने मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री व आरोग्य संचालक यांच्याकडे दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई येथील कूपर रुग्णालयात नालासोपारा येथून उपचारासाठी दाखल झालेल्या कैलास सिंग (वय ३८) या अत्यवस्थ रुग्णाला आयसीयू बेडची आवश्यकता असतानाही तो उपलब्ध करून देण्यात आला नाही तसेच रुग्णालय प्रशासनाने "बेड उपलब्ध नाही" असे सांगून रुग्णाला जनरल वॉर्डमध्येच ठेवले व अन्य रुग्णालयात उपचारासाठी नेण्यास नकार दिला त्यामुळे त्यांचा दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तीव्र पोटदुखीमुळे दाखल झालेल्या संध्या यादव या तरुणीला देखील आयसीयू बेड उपलब्ध नसल्याचे सांगून डॉक्टरांनी उपचारासाठी स्ट्रेचरवरच ठेवले असता उपचारादरम्यान स्ट्रेचरवरून खाली पडून गंभीर जखमी झाल्याने तिचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधित डॉक्टर व प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच अतिदक्षता विभागात खाटा तसेच मनुष्यबळदेखील कमी असल्याने रुग्ण दगावण्याच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, दरवर्षी आरोग्य यंत्रणेवर हजारो कोटी रुपये खर्च केले जात असतानाही रुग्णालयांमध्ये अपुऱ्या सोयी सुविधा व अतिदक्षता विभागात खाटांची कमतरता असण्यामागची कारणे काय आहेत,

(७) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयांमध्ये प्रत्येक रुग्णाला बेड उपलब्ध व्हावा यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ४ मोठी रुग्णालये व १६ उपनगरीय रुग्णालयामध्ये एकूण ८५१ आयसीयू बेड व ८३ एमआयसीयू बेड उपलब्ध आहेत.

तांत्रिकदृष्ट्या अतिदक्षता विभागात एका बेडकरीता एकच व्हेंटिलेटर व्यवस्था असल्याने एका बेडवर २ रुग्णांना किंवा जमिनीवर गादी टाकून उपचार करणे शक्य होत नाही.

(३) यासंदर्भात मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांच्याकडे लेखी निवेदन दिले, ही बाब खरी आहे. यासंदर्भात आरोग्य संचालनालयाकडे लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) हे खरे नाही.

श्री.कैलास सिंग (वय ३८ वर्ष) यांना दिनांक २५ एप्रिल, २०२६ रोजी अत्यंत गंभीर अवस्थेत कूपर रुग्णालयात आणण्यात आलेले होते. त्यांची गंभीर स्थिती विचारात घेऊन त्यांना अत्यावश्यक उपचार देण्यात आले.

तथापि, त्यांचा "सेप्टिक शॉक, ॲक्यूट रिनल फेल्युअर आणि दीर्घकालीन डी-कॉम्पेन्सेटेड लिव्हर डिसीज सह Hepatic Encephalopathy" या कारणाने मृत्यू झाला व तो नैसर्गिक होता.त्यांचा मृत्यू बेड उपलब्ध नसल्याने झालेला नाही.

(५), (६) व (७) हे खरे नाही.

श्रीमती संध्या यादव यांना पोटदुखी, पोट फुगणे इ. आजार होते. त्यांचा दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी मृत्यू झाला. सदर घटनेची शल्यचिकित्सा विभाग अंतर्गत दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी चौकशी पूर्ण केली असून रुग्णाच्या उपचारात कोणतीही कसूर व निष्काळजीपणा झाल्याचे रुग्णालयाच्या निदर्शनास आले नाही.

कूपर रुग्णालयात अतिदक्षता विभागात ५९ व वैद्यकिय अतिदक्षता विभागात १० बेड उपलब्ध आहेत.

सद्य:स्थितीत कूपर रुग्णालयात वैद्यकिय अतिदक्षता (MICU) विभागात २५ बेडचा स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याबाबत निविदा मागविण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून तातडीने बेडच्या संख्येत वाढ करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## वडाळा-कासारवडवली या मेट्रो-४ मार्गिकेवर मुलुंड येथे संरक्षण कठडा कोसळून दुर्घटना झाल्याबाबत

**(६) * ८७१५ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा-ठाणे-कासारवडवली मेट्रो-४ मार्गिकेच्या कामादरम्यान मुलुंड (प.) येथील एलबीएस मार्गावर संरक्षण कठडा (पॅरापेट) कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका नागरिकाचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या मे. डी. बी. इंजिनियरिंग ॲण्ड कन्सल्टिंग जी.एम.बी.एच., हिल इंटरनॅशनल आय.एन.सी. ॲण्ड लुईस बर्जर कन्सल्टिंग प्रा. लि. या सल्लागार कंपन्यांचे कंत्राट रद्द केले असून, कंत्राट रद्द केल्यानंतर आयेशा आणि कन्सल्टिंग इंजिनिअर्स ग्रुप (सीईजी) या सल्लागाराची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमएमआरडीएने आयेशा आणि कन्सल्टिंग इंजिनिअर्स ग्रुप (सीईजी) या सल्लागाराची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरु केलेली असताना कंत्राट रद्द केलेल्या कंपनीला काळ्या यादीत न टाकता पुन्हा काम देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर दुर्घटनेनंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो ४ मार्गिकेच्या संपूर्ण कामाची सुरक्षा तपासणी करण्याचा निर्णय घेऊन सदर मार्गिकेची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदर दुर्घटनेची शासनाने दखल घेऊन जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर व कंत्राटदारांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

मेट्रो मार्ग-४ प्रकल्पांतर्गत मुलुंड अग्निशमन केंद्राजवळ मेट्रो व्हायाडक्टवर दिनांक १३/०२/२०२६ रोजी रात्री पॅरापेट/कठडे उभारण्यात आले होते. प्रचलित पध्दतीनुसार, हे पॅरापेट/कठडे प्रिकास्ट असल्याने, सुरुवातीस तात्पुरत्या आधाराने ठेवले जातात. तेथील कॉंक्रीटचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर प्रिकास्ट पॅरापेट/कठडे कायमस्वरूपी स्थित होतात. सदर ठिकाणी काही पॅरापेट/कठडे तात्पुरत्या आधारावर स्थित होते. परंतु, दिनांक १४/०२/२०२६ रोजी कामगाराकडून अनावधानाने एका पॅरापेट कठड्याचा तात्पुरता आधार कापला गेल्याने तो पॅरापेट कठडा खालील रस्त्यावर जाणाऱ्या वाहनावर कोसळला. या दुर्घटनेत एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाले.
(२) व (३) सदर प्रकल्पाचे काम सुमारे ९०% पूर्ण झाले असल्याने कामातील सातत्य राखण्यासाठी उर्वरित कामांसाठी नवीन प्रकल्प सल्लागार नेमणे किंवा दुसऱ्या सल्लागारामार्फत (मेट्रो मार्ग-२ब चे प्रकल्प सल्लागार-AICA) करण्याबाबत चाचपणी करण्यात आली. परंतु काम ९० टक्के पूर्ण झाले असल्याने उर्वरित कामांसाठी नवीन प्रकल्प सल्लागार नेमणे योग्य ठरले नसते. यास्तव सदर प्रकल्पावर कार्यरत असणाऱ्या सल्लागार कंपनी (मे. डी. बी. इंजिनियरिंग ॲण्ड कन्सल्टिंयग जी.एम.बी.एच., हिल इंटरनॅशनल आय.एन.सी. ॲण्ड लुईस बर्जर कन्सल्टिं ग प्रा. लि.) करार रद्द केला नसून सुरुवातीपासून कार्यरत असणऱ्या सल्लागार कंपनीस मुदतवाढ देऊन काम सुरु ठेवण्यात आले आहे.
(४), (५) व (६) सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने संपूर्ण मेट्रो मार्ग - ४ ची सुरक्षा तपासणी करण्याकरीता प्राधिकरणाने समिती स्थापित केली होती. सदर समितीचा तपासणी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात नमूद केल्याप्रमाणे सुरक्षा उपाययोजना प्रकल्पस्थळी राबविण्यात येत आहेत.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने पोलिसात गुन्हा दाखल झाला असून प्रकल्पाशी संबंधित यामध्ये सल्लागार कंपनीचे २ व कंत्राटदाराचे ३ अशा पाच जणांना अटक करण्यात आली आहे. सदर दुर्घटनेसाठी कंत्राटदारास रुपये ५.०० कोटी व साधारण सल्लागारास रुपये १.०० कोटी इतका दंड लावण्यात आला आहे. तसेच प्रकल्पाशी संबंधित प्राधिकरणातील तीन आभियांत्रिकी अधिकाऱ्यांवर देखील निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

----------------

## नागपूर महानगरपालिकेच्या ई-बसेसकरीता चार्जिंग सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) * ८६९४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील प्रदूषण रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून महानगरपालिकेला पर्यावरण पूरक १४० ई- बसेस उपलब्ध करुन देण्यात आल्या असून चार्जिंगची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे अनेक बसेस विनावापर उभ्या असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेची 'आपली बस' सेवा शहरातील सार्वजनिक प्रवासी वाहतुकीसाठी अत्यंत आवश्यक असून, नागपूर शहरात वाठोडा व खापरी या दोन ठिकाणी बस डेपो असून त्या ठिकाणी पुरेशी चार्जिंगची व्यवस्था उपलब्ध नाही तसेच जे चार्जिंग पॉइंट उपलब्ध आहेत ते एकूण बसेसच्या संख्येच्या तुलनेत अत्यंत कमी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई- बसेसच्या चार्जिंगच्या समस्येमुळे नागरिकांना जुन्या डिझेल बसेसवर अवलंबून राहावे लागत असून, नागपूर बससेवेच्या ताफ्यामध्ये एकूण २५० बसेस उपलब्ध होणार असून त्याकरीता बस डेपोची सेवा व चार्जिंग सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शहर बस डेपो, वाठोडा व शहर बस डेपो, खापरी या दोन्ही डेपोंमध्ये बस संख्येच्या प्रमाणात पुरेश्या चार्जींग पॉईटंची व्यवस्था आहे.

(३) माहे एप्रिल, २०२६ मध्ये नागपूर शहर बससेवेच्या ताफ्यामध्ये २५० वातानुकुलित ई- बसेसचा समावेश झाला असून त्याकरीता पुरेसे चार्जिंग पॉईटंस उपलब्ध आहेत. चार्जिंगच्या समस्येमुळे नागरिकांना जुन्या डिझेल बसेसवर अवलंबून राहावे लागत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील आदिवासी व शेतकऱ्यांच्या हितासाठी 'मोहफुल नियम १९५०' रद्द करण्याबाबत

**(८) * ९१७२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व यवतमाळ या जिल्ह्यांतील आदिवासी, शेतकरी व गावकऱ्यांच्या उपजिविकेचे मोहफुल हे मुख्य साधन असून महाराष्ट्र प्रोहिबिशन (अबकारी) ॲक्ट १९५० च्या जाचक निर्बंधांमुळे राज्यात मोह फुलांची खरेदी-विक्री, वाहतूक व साठवणुकीवर बंदी असून, केवळ परवानाधारक व्यक्तीलाच व्यापाराची अनुमती असल्याने शेतकऱ्यांना अत्यंत कमी भाव मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोहफुल गोळा करणे व व्यापारावरील जाचक निर्बंध हटविल्याने विदर्भात मोहफुलांच्या झाडांच्या लागवडीस, मोहफुलांवरील प्रक्रिया उद्योगांना चालना मिळून या माध्यमांतून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व पर्यावरणाचे रक्षण होऊन आदिवासी जनतेला आर्थिक फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उत्पादनाचा १०% हिस्सा अबकारी रेकॉर्डमध्ये नोंदविला जात नसून शासनाच्या या धोरणामुळे मोहफुलांची छत्तीसगड व इतर राज्यांत मोठ्या प्रमाणात तस्करी व काळाबाजार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाच किलोपेक्षा जास्त मोह फुलांच्या वाहतुकीवर रुपये २० हजार दंड किंवा ३ वर्षांच्या शिक्षेची तरतूद असल्यामुळे उत्पादनावर विपरीत परिणाम होत असून, शेजारील मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्यांनी हे नियम रद्द केले असून केंद्र शासनाने यास ‘कृषी उपज’चा दर्जा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मोहफुलांच्या तस्करीमुळे होणाऱ्या महसुली नुकसानीबाबत तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मध्यप्रदेश व छत्तीसगडच्या धर्तीवर महाराष्ट्र प्रोहिबिशन ॲक्टमधील ‘मोहफुल नियम १९५०’ रद्द करण्याबाबत तसेच मोहफुलावरील निर्बंध हटवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे खरे नाही.
(२) मोहफुलापासून उद्योगाला चालना देण्याचे शासनाचे धोरण असून अशा प्रकारे मोहफुलावर प्रक्रिया करुन उपउत्पादन करण्यासाठी मोहफुलाच्या साठवणूकीकरीता आवश्यक नमुना एमएफ-१ अनुज्ञप्ती नियमानुसार मंजूर करण्यात येते.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) मोहफुलाबाबत खालीलप्रमाणे शासन धोरण आहे.
i) मोहफुल हे कृषी उपज नसून वन उपज आहे.
ii) शासन अधिसूचना, दिनांक १३/०५/१९७६ नुसार राज्यात वेगवेगळया भागातील मोहाफुले हंगाम कालावधीनुसार विहित केलेल्या कालावधीत मोहफुलाची साठवणूक, खरेदी-विक्री, वाहतूक इत्यादी करीता कोणत्याही परवान्याची गरज नाही.
iii) राज्यातील आदिवासी सक्षमीकरणासाठी नेमलेल्या खारगे समितीच्या शिफारशीनुसार सन २०२१-२२ मध्ये मोहफुल धोरणात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार केवळ आदिवासी क्षेत्रातील आदिवासी विकास संस्था, महिला बचत गट, सहकारी संस्था व ग्रामपंचायत अशा प्रकारच्या मान्यताप्राप्त संस्था यांना मोहफुले विक्रीकरीता नवीन एमएफ-२ परवाना मंजूर करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, सदर धोरणानुसार मोहफुले गोळा करणे (एमएफ-३), खरेदी करणे (एमएफ-४), वाहतूक करणे (एमएफ-५) परवाना आवश्यकतेबाबतच्या तरतूदी रद्द करण्यात आल्या आहेत.
iv) शासन निर्णय, दिनांक २३/०६/२०२२ अन्वये काजुबोंडे व मोहफुले पासून उत्पादित मद्यास “विदेशी मद्य” असा दर्जा देण्यात आला असून याकरीता उत्पादन शुल्क दर रुपये ५० प्रति प्रुफ लिटर असा सवलतीचा ठेवण्यात आला आहे.

v) मोहफुलाच्या हंगामानुसार विहित केलेल्या कालावधी व्यतिरिक्त इतर कालावधीत मोहफुलाची बेकायदेशीररित्या विक्री इत्यादी करीता महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम ६९ नुसार दोन वर्षापर्यंत शिक्षा किंवा रुपये ५०,०००/- पर्यंत द्रव्य दंड किंवा दोन्ही अशी शिक्षेची तरतूद आहे.

-----------------

## अन्न व औषध प्रशासन विभागाकडे विषशोधक चाचणी यंत्रणा उपलब्ध नसल्याबाबत

**(९) * ९६५४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पायधुणी (मुंबई) येथील एकाच कुटुंबातील चौघांचा कलिंगड व बिर्याणी खाल्ल्यानंतर मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी आवश्यक असलेली विषशोधक, कीटकनाशकांचा अंश, आरोग्यासाठी अपायकारक द्रव्याचा समावेश तपासण्यासाठी लागणारी वैशिष्ट्यपूर्ण चाचणी यंत्रणाच राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाकडे उपलब्ध नसल्याची बाब माहे एप्रिल,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत्यूचे कारण कलिंगड, बिर्याणी किंवा अन्य कोणते अन्नपदार्थ होते का याबाबत तपासात काय निष्पन्न झाले तसेच अन्न नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे काय, असल्यास त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केल्यानंतर मंजुरी मिळून देखील आजतागायत अन्न व औषध प्रशासनाला यंत्रसामग्री किंवा नव्या तंत्रज्ञानासाठी आवश्यक निधीकरीता वैद्यकीय शिक्षण विभागावर अवलंबून राहावे लागत असून सदर विभागाकडून विलंबाने मान्यता मिळत असल्याने अन्न व औषध प्रशासनाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाकडे सदर यंत्रणा वापरण्याकरीता आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने अशा प्रकारच्या विषबाधा संबंधित घटनांमध्ये न्यायवैद्यक प्रयोगशाळा किंवा शेतीसंबंधी प्रयोगशाळांकडे नमुने पाठवावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागरिकांच्या आरोग्याचे हित जपण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने विषशोधक यंत्रणा तातडीने सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधित विक्रेते/पुरवठादार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) अंशत: खरे आहे.

अपायकारक द्रव्यातील काही घटकांची तपासणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेत सध्या High Performance Liquid Chromatography (HPLC), Gas Chromatography (GC) इ. संवेदनशील उपकरणे उपलब्ध आहेत. तथापि, विषशोधक, कीटकनाशकांचा अंश, आरोग्यासाठी अपायकारक द्रव्यातील काही घटकांच्या तपासणीसाठी आवश्यक असलेली अतिसंवेदनशील उपकरणे - Gas Chromatography Mass Spectrometry (GC-MS), Liquid Chromatography Mass Spectrometry (LC-MS), Inductively Coupled Plasma-

Mass Spectrometry (ICP-MS) प्रयोगशाळेत सध्या उपलब्ध नाहीत, हि वस्तुस्थिती आहे.
(२) सदर घटनास्थळावरून अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी चिकन पुलाव, कलिंगड, खजुराचे तुकडे, तांदूळ, बाटलीतील पाणी, माठातील पाणी, लवंग, दालचिनी, जीरा, ब्राऊन द्रव्य यांचे उपलब्ध साठ्यातून अनौपचारिक अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले होते. सदर अन्नपदार्थ विश्लेषणासाठी अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठविण्यात आले होते. सदर सर्व नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. तसेच, सर जे जे मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी दिलेल्या दिनांक १०/०६/२०२६ पत्रामध्ये वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालिना, मुंबई यांनी चिकन पुलाव, चिकन, तांदूळ, लवंग, जिरे, खजूर तुकडे, माठातील पाणी, बाटलीतील पाणी, मिश्रित पाणी यामध्ये विष आढळले नसल्याचे तसेच, कलिंगड च्या नमुन्यामध्ये झिंक फोस्फॉईड हा विषारी घटक आढळल्याचे नमूद केले आहे. सदर पत्रात संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी रक्ताचे व व्हीसेराचे रासायनिक परीक्षण अहवाल, हिस्टॉपॅथॉलॉकल अहवाल व मायक्रोबायोलोजी अहवालानुसार सदर कुटुंबातील चारही जणांचा मृत्यू death due to zinc phosphide poisoning (unnatural) झाला असल्याचे नमूद आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी पोलीसांकडून करण्यात येत आहे.
(३) केंद्र शासनाकडून अन्न सुरक्षा कार्यप्रणालीचे बळकटीकरण या योजनेच्या सन २०२५-२६ च्या कृती आराखड्यास दिनांक २३/११/२०२५ रोजी दिलेल्या मंजुरीनुसार आयुक्त यांचेकडून शासनास माहे डिसेंबर, २०२५ मध्ये प्रस्ताव प्राप्त झाले. त्यानुसार आयुक्त कार्यालयामार्फत सदर उपकरण खरेदी करण्यासाठी विभागाकडून माहे जाने, २०२६ मध्ये मान्यता देण्यात आली. त्यानुसार, सदर उपकरणे खरेदी करण्यासाठी GeM पोर्टल व Mahatender वर टेंडर प्रकाशित करण्यात आले होते. परंतु, सदर निविदेला अपेक्षीत प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे High End Equipment (ICP-MS, GC-MSM, LC-MSMS) उपकरणे खरेदी होऊ शकले नाहीत.
(४) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळांमध्ये संवेदनशील उपकरणे उपलब्ध असून त्यावर गुणवत्ताधारक व कुशल मनुष्यबळ कार्यरत आहे. मात्र, विषशोधक, कीटकनाशकांचा अंश व आरोग्यासाठी अपायकायरक द्रव्यातील काही घटकांची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेली अतिसंवेदनशील उपकरणे (ICP-MS, GC- MSMS, LC-MSMS) सध्या राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे असे नमुने FSSAI Notified, NABL-Accredition प्राप्त प्रयोगशाळांकडे पाठविले जातात.
(५) अन्न सुरक्षा कार्यप्रणालीचे बळकटीकरण या योजनेच्या सन २०२६-२७ च्या सामंजस्य करारामध्ये उपकरणे खरेदीसाठी २७३० लाख रुपये निधीची तरतुद प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर सामंजस्य करारास केंद्र शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून विषशोधक, कीटकनाशकांचा अंश व आरोग्यासाठी अपायकायरक द्रव्यातील काही घटकांची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेली अतिसंवेदनशील उपकरणे (ICP-MS, GC-MSMS, LC-MSMS) खरेदी करण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या तत्कालीन शहर अभियंत्याविरुध्दच्या चौकशीत पारदर्शकता आणून कारवाई करण्याबाबत

**(१०) * ९६१२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेचे तत्कालीन शहर अभियंता यांच्याविरुध्द सुमारे २ हजार कोटी रुपये एवढया रकमेच्या बेहिशेबी मालमत्ताप्रकरणी एसीबी चौकशीचा मार्ग मोकळा झाला असताना, तत्कालीन आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी दिलेला चौकशीचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन शहर अभियंता यांनी सेवेत असताना स्वतःच्या, कुटुंबाच्या व विविध कंपन्यांच्या नावे बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप असून एसीबीच्या प्राथमिक चौकशीत परदेश दौरे, मुलांचे शिक्षण व गुंतवणुकीची माहिती गुप्त ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका आयुक्तांच्या चौकशीच्या आदेशावर मा.उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून एसीबी चौकशी फेटाळून लावणे हे गैरव्यवहार तपासाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करणारे असून शासकीय नियमांचे उल्लंघन करणारे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषी आढळून आलेल्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच, महानगरपालिका अभियंत्यांसारख्या शासकीय पदावरील व्यक्तींच्या मालमत्ता तपासणीसाठी स्वतंत्र व पारदर्शक यंत्रणा निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून दिनांक १८/०५/२०१६ रोजी प्राप्त तक्रारी अर्जावरू गुप्त चौकशी सुरू करण्यात आलेली होती. सदर गुप्त चौकशीवरून उघड चौकशीची परवानगी मिळण्याबाबत तत्कालीन आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना अहवाल सादर करण्यात आला होता.या प्रकरणात आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी दिनांक २५/०४/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उघड चौकशीची परवानगी नाकारलेली होती.

त्यामुळे तक्रारदार यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रिमीनल रिट पिटीशन क्र.४६८०/२०२१ अन्वये दाखल केले होते. सदर रिट याचिकेचा दिनांक ०२/०४/२०२६ रोजीच्या आदेशामध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचा उघड चौकशीची नाकारल्याचा आदेश रद्द करून तत्कालीन शहर अभियंता, पुणे महानगरपालिका यांची उघड चौकशी करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी अद्यापर्यंत चौकशी पूर्ण झालेली नाही. तसेच, शासकीय निकषानुसार पुणे महानगरपालिकेतील वर्ग १ ते ३ यांची गोपनीय मालमत्ता विवरणपत्र प्रत्येक आर्थिक वर्षी घेण्याची कार्यवाही केली जाते. त्यामध्ये मालमत्ता विषयक चौकशीच्या अनुषंगाने प्रकरणपरत्वे अशा कर्मचाऱ्यांनी सादर केलेली विवरणपत्रे ही महानगरपालिका आयुकत यांच्या मान्यतेने उघड करून ती तपास यंत्रणेकडे

वेळोवेळी पाठविण्याची व्यवस्था पुणे महानगरपालिका स्तरावरून प्राधान्याने केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भामा-आसखेड (जि.पुणे) धरणातून पिंपरी-चिंचवड शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(११)** * **९०११ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामा-आसखेड (जि.पुणे) धरणातून पिंपरी-चिंचवड शहरास १६७ एमएलडी पाणी आणण्यासाठी भुमीगत जलवाहिनीचे महत्त्वाचे काम सुरू असून शहराला मुबलक पाणी मिळवून देणाऱ्या भामा-आसखेड प्रकल्प लवकर पूर्ण करण्याची मागणी होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण न करणाऱ्या तसेच कामात त्रुटी ठेवलेल्या व काळया यादीत समावेश असलेल्या ठेकेदारालाच पुन्हा काम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भामा-आसखेड जलवाहीनीचे काम नियोजित वेळेत न केलेल्या ठेकेदारालाच काम देण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, भामा-आसखेड (जि.पुणे) धरणातून पिंपरी-चिंचवड शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे काम लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सद्य:स्थितीत उर्वरीत कामांसाठी नव्याने दोन निविदा काढण्यात आलेल्या आहेत. त्यातील,
१) नवलाख उंब्रे ब्रेकप्रेशर टाकी पासून तळवडे देहू पर्यंत १४०० मी.मी. व्यासाची गुरुत्वनलिका टाकणेविषयक उर्वरित कामे करणे.
कामाची मुदत १० महिने.
निविदा रक्कम रुपये ५०,६८,९२,३६४/-
२) भामा आसखेड धरणावरील अशुध्द जलउपसा केंद्रा पासून नवलाख उंब्रे ब्रेकप्रेशर टाकीपर्यंत १७०० मि.मी. व्यासाची रायझिंग मेन टाकणे विषयक उर्वरित कामे करणे.
कामाची मुदत ९ महिने.
निविदा रक्कम रुपये ३३,३४,४३,९२०/-
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरातील रस्त्यांवरील धोकादायक विद्युत खांब स्थलांतरीत करण्याबाबत

**(१२) * ९०९४ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील अरुंद रस्ते व रस्त्याच्या मधोमध उभे असलेले धोकादायक विद्युत खांब काढण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने रुपये २८ कोटी एवढ्या रकमेचा निधी मंजूर केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी उपलब्ध झाल्यानंतर महानगरपालिकेने सलग ६ वेळा निविदा प्रसिध्द करूनही एकाही पात्र ठेकेदाराने या कामाकरीता निविदा भरलेली नसून महावितरणच्या नियमांनुसार कामाचा दर्जा राखावा लागणे आणि कामातील तांत्रिक अडचणींमुळे यामुळे ठेकेदार निविदा भरत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील रस्त्यांच्या मधोमध उभ्या असलेल्या धोकादायक विद्युत खांबांमुळे वारंवार अपघात होत असल्यामुळे हे खांब तात्काळ हटविण्यासाठी महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) यापूर्वी, सन २०२४ मध्ये जिल्हा नियोजन समितीकडून महानगरपालिकेस रुपये ७.०० कोटी निधी प्राप्त झाला असून त्यामध्ये स्मार्ट सिटी अंर्तगत विकसीत होणाऱ्या रस्त्यांच्या मध्ये अडथळा ठरणारे म.रा.वि.वि कंपनीचे धोकादायक व रस्त्यांत अडथळा ठरणारे खांब स्थलांतरित करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात अतिक्रमण निष्कासित मोहिम, मुख्य मार्गाचे रस्ता रुंदीकरणाची मोहिम हाती घेण्यात आली असून सदरचे रस्त्यांत अडथळा व धोकादायक ठरणारे महावितरण कंपनीचे खांब स्थलांतरीत करणे, उच्च/लघुदाब वाहिन्या व रोहित्रे स्थलांतरीत करणे ही कामे आवश्यक आहेत. या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्हा वार्षिक योजना (DPDC) अंतर्गत शहरातील एकूण ९ रस्त्यांची कामे प्रस्तावित असून त्यांसाठी रुपये ३०.८४ कोटी रक्कमेच्या कामांना दिनांक १५/१०/२०२५ रोजीचे आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर रुपये ३०.८४ कोटी इतका निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. सदर कामासाठी महानगरपालिकेकडून निविदा प्रकिया राबविण्यात आली असून "छत्रपती संभाजीनगर जालना स्थानिक प्राधिकारी निवडणूक २०२६" ची आचारसंहिता संपुष्टात येताच, पात्र कंत्राटदारास कार्यादेश देण्याची तजवीज महानगरपालिकेने ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समता नगर, कांदिवली (पू.) येथील इमारतींच्या पुनर्विकासाच्या नवीन प्रस्तावास मंजुरी दिल्याबाबत

**(१३) * ९४१४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समता नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई येथील २२ (MIG) इमारतीच्या पुनर्विकास करण्यात येत असलेल्या जागेत बदल, ३२ मजल्याच्या २ इमारतीं ऐवजी ६३ मजल्यांच्या ४ इमारती, अतिरिक्त सदनिका बांधकाम व एकूण मंजूर जागा २.७ एकर ऐवजी २.१ एकर करण्याचा प्रस्तावास उक्त इमारतीमधील रहिवाशांना विश्वासात न घेता म्हाडाने माहे एप्रिल, २०२६ मध्ये मंजूरी दिली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प दीर्घकाळ प्रलंबित असल्याने मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी माहे जुलै, २०२५ मध्ये घेतलेल्या बैठकीत तीन वर्षांचे आगाऊ भाडे जमा करुन इमारतीच्या बांधकाम संस्थेसोबत केलेल्या करारानुसार तातडीने सुरु करण्याबाबतचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी म्हाडाने मूळ करारानुसार जाण्याऐवजी इमारतीचे बांधकाम दीर्घकाळ प्रलंबित ठेवणाऱ्या विकासकाच्या बाजूने निर्णय देण्याची कारणे काय आहेत तसेच भविष्यात अशा प्रकारे रहिवाशांना विश्वासात न घेता इमारतीच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याच्या घटना टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. समता नगर, कांदिवली (पुर्व) मुंबई येथील २२ (MIG) इमारतींच्या ३२ मजल्यांच्या दोन इमारतींबाबत प्रस्ताव इमारत परवानगी कक्ष/म्हाडा यांचे कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

दिनांक १८/१२/२०२१ रोजी मंजूर केलेल्या सुधारीत अभिन्यासानुसार भुखंड क्र.२२ मधून अस्तित्वात असलेल्या रस्त्याचे क्षेत्रफळ वजा करुन १.९० एकर क्षेत्रफळाचा भुखंड ग्राहय धरण्यात आला आहे. त्यानुसार इमारतींच्या Concession प्रस्तावास दनिांक ११/०३/२०२६ रोजी म्हाडाकडून मंजुरी देण्यात आलेली आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे. मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०७/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, विषयांकित पुनर्विकास प्रकल्पातील सर्व मूळ सभासदांना ठरल्याप्रमाणे भाडे नियमितपणे अदा करण्यात यावे. तसेच पुढील ३ वर्षाचे आगाऊ भाडे जमा करुन मूळ सभासदांना अदा करण्याबाबत म्हाडाच्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. पुनर्वसित इमारतीचे बांधकाम तातडीने सुरु करण्यात यावे. त्यासाठी म्हाडास्तरावर ठराविक मुदतीत कार्यवाही करण्यात यावी. पुनर्वसित इमारतींचा बांधकाम कालावधी ३ वर्ष विहित करुन मूळ सभासदांना अवगत करण्यात यावे, असे निर्देश दिले. त्यानुसार समतानगर सह. गृह. संस्था युनियनचे कुलमुखत्यारधारक मे. एस.डी.कार्पोरेशन प्रा. लि. यांनी सादर केलेल्या प्रस्तावित बांधकाम नकाशांना म्हाडाकडून IOA (Intimation of approval) जारी करण्यात आला आहे.

तथापि, मध्यम उत्पन्न गटाच्या ३५ इमारतींपैकी ११ इमारतींच्या सह. गृह. नि. संस्थांनी एकत्रित पुनर्विकासामधून त्यांच्या इमारतींना वगळून स्वतंत्र पुनर्विकासाकरीता परवानगी मिळणेबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या असून सदर याचिकांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात सुनावणी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी येथील झुणका भाकर केंद्रांचा बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात समावेश करण्याबाबत

**(१४)** * **८६५२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतून झुणका भाकर केंद्र योजनेंतर्गत साकार झालेल्या व सन १९९६ पासून कार्यरत असलेल्या वरळी येथील बीडीडी चाळ परिसरातील १४ झुणका भाकर केंद्रांचा अद्यापही बीडीडी चाळ पुनर्विकासात अंतिम परिशिष्ट –२ मध्ये समावेश करण्यात आला नसल्याची बाब दिनांक ३ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरळी येथील केंद्र चालकांकडे जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे मान्यता पत्र, सार्वजनिक बांधकाम विभागाची जागेची ताबा पावती, व्यवस्थापक, बीडीडी चाळ यांचे ना- हरकत पत्र, सन १९९६ पासूनचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा गुमास्ता परवाना आणि सन १९९७ पासूनच्या अधिकृत वीज जोडण्या इत्यादी महत्त्वाचे दस्तऐवज उपलब्ध असतानाही या झुणका भाकर केंद्रांची तत्सम प्राधिकरणाने अद्यापही पात्रता निश्चिती केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीडीडी चाळ, वरळी, झुणका भाकर केंद्र चालक संघटनेने शासनाकडे झुणका भाकर केंद्राची जागा बीडीडी पुनर्विकास प्रकल्पात सामावून घेण्याबाबतच्या दिनांक ७ जून, २०२३ रोजीच्या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, वरळी येथील झुणका भाकर केंद्र चालकांमध्ये मनात अद्यापही निष्कासनाची चिंता, अन्यायाची भावना निर्माण झाली असून बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात या सर्व झुणका भाकर केंद्रांना संरक्षित करून पात्र करण्याबाबत तसेच निष्कासित केलेल्या तेथील दोन झुणका भाकर केंद्रांना तातडीने मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे. झुणका भाकर केंद्रांचा समावेश बी.डी.डी. चाळी पुनर्विकास प्रकल्पात करण्याबाबतचा प्रस्ताव म्हाडा व शासनाच्या मार्च, २०२५ पासून विचाराधीन आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) बी.डी.डी. चाळी, वरळी, झुणका भाकर केंद्र चालक संघटनेचे दिनांक १७/०७/२०२३ रोजी प्राप्त निवेदन शासन पत्र दिनांक २७/०७/२०२३ च्या पत्रान्वये मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ व संचालक बी.डी.डी. यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते. सदर निवेदन पात्रता निश्चितीसाठी म्हाडाकडून उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) वांद्रे-१ तथा सक्षम प्राधिकारी, वरळी यांना पाठविण्यात आले. त्यावर झुणका भाकर केंद्राची पात्रता निश्चित करण्याची बाब उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) वांद्रे-१ तथा सक्षम प्राधिकारी, वरळी यांच्या अधिकार कक्षेत येत नसल्याबाबत कळविले. याबाबत विभागस्तरावर दिनांक २५/०९/२०२५ रोजी आयोजित बैठकीमध्ये, मुख्य अधिकारी मुंबई मंडळ, म्हाडा यांचेकडून बी.डी.डी. चाळ परिसरातील जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी चालविण्यास दिलेले झुणका भाकर केंद्रे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे पदपथावरील बांधकामे इ. इतर सर्व बांधकामांबाबत संबंधित उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी व संचालक बी.डी.डी. यांच्यासह आढावा घेण्यात यावा. प्रकल्पाची वर्धनक्षमता विचारात घेऊन अशा सर्व बांधकामांना बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत पात्र करण्याबाबत म्हाडाने नियोजनात्मक दृष्ट्या अभ्यास करुन त्यानुसार मा.मंत्रिमंडळासमोर सादर

करण्यासाठी उपाध्यक्ष, म्हाडा यांनी स्वयंस्पष्ट परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार म्हाडास्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात निकृष्ट व भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१५) * ९३८७ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत निकृष्ट व भेसळयुक्त खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई होत नसून अन्न सुरक्षा नियमांची अंमलबजावणी करण्यात निष्काळजीपणा होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भेसळयुक्त खाद्यपदार्थ आढळून आल्यानंतर अधिकाऱ्यांकडून हप्ता वसुली होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून, केवळ छापेमारी करून नंतर कारवाईमध्ये शिथिलता येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यात अन्न सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी करुन भेसळयुक्त अन्नपदार्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच केलेल्या कारवाईतील अनियमितता रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भेसळयुक्त खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सांगली जिल्ह्यात दिनांक ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मे २०२६ या कालावधीत एकूण १३५ अन्न व्यवसाय आस्थापनांची तपासणी करुन सदर कालावधीत १०५ अन्न नमुने विश्लेषणाकरीता घेण्यात आले आहेत. तसेच तपासणीदरम्यान संशयित अन्नपदार्थांच्या अनुषंगाने ४ ठिकाणी कारवाई करुन विविध अन्नपदार्थाचा २६,१८५ कि.ग्रॅ. वजनाचा व रुपये ६९,६७,३७०/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. तपासणी केलेल्या आस्थापनांपैकी २७ परवानाधारक आस्थापनांना तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या कलम ३२ अन्वये सुधारणा नोटिस बजावण्यात आल्या आहेत. त्यापैकी ६ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यामध्ये एकूण रुपये ७५,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. उर्वरित २१ तडजोड प्रकरणांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सांगली जिल्ह्यात प्रतिबंधित अन्नपदार्थ (गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू व तत्सम पदार्थासंदर्भात) एकूण १३ ठिकाणी कारवाई करण्यात आली असून रुपये २,०१,३३०/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला असून सर्व प्रकरणी पोलीसांकडे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनामार्फत नियमीतपणे मोहिमा राबविण्यात येवून नववर्ष आणि सणांमध्ये अन्न आस्थापनांची तपासणी करून अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात. कमी दर्जा व मिथ्याछाप

नमुना प्रकरणी परवानापात्र आस्थापनांविरुध्द न्यायनिर्णय प्रकरणे दाखल केली जातात व नोंदणीपात्र आस्थापनांविरुध्द तडजोड (Compounding) प्रकरणे दाखल केली जातात तसेच, असुरक्षित नमुने प्रकरणी मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात येतात.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड-रायगड दरम्यानच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१६) * ९६९३ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक राजधानी असणाऱ्या किल्ले रायगड व परिसरातील विकासकामांसाठी रायगड प्राधिकरण स्थापन करण्यात आले असून या प्राधिकरणांतर्गत महाडकडून रायगडाकडे जाणाऱ्या मार्गाच्या अपूर्ण रुंदीकरणामुळे रस्त्यांची दुरवस्था होऊन कोट्यवधी रकमेच्या शासकीय निधीचा अपव्यय झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगडवाडी परडी, खर्डी नगरभुवन, रायगड रोपवे नेवाळी, खलई रस्ता अशा अनेक रस्त्यांवर खड्डे पडले असून याबाबत शिवप्रेमी व नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठेकेदारांच्या मनमानी आणि निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे त्रुटींविषयी जबाबदारी निश्चित करून शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता तात्काळ व दीर्घकालीन उपाययोजना आखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही. महाडकडून रायगडाकडे जाणाऱ्या (महाड-पाचाड-रायगड किल्ला) राष्ट्रीय महामार्ग NH१६६F या रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम हे केंद्रीय रस्ते, वाहतूक व परिवहन मंत्रालय यांचे मार्फत मंजूर असून सद्य:स्थितीत राष्ट्रीय महामार्गाच्या दुपदरीकरणाचे सुमारे ९९.५ % काम पूर्ण झालेले आहे. एकूण २५.६०९ कि.मी. लांबीपैकी नातेखिंड येथील सुमारे १०० मीटर लांबीचे काम तसेच वाळसुरे येथील पुलाचे काम प्रगतीपथावर असून, उर्वरित संपूर्ण लांबीवरील महामार्गाचे काम पूर्ण झालेले आहे.
(२) हे खरे नाही. रायगडवाडी परडी, रायगड रोपवे नेवाळी, खलई रस्त्याच्या नुतनीकरणाकरीता रायगड विकास प्राधिकरण अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये व खर्डी नगरभुवन रस्त्याकरीता सन २०२२-२३ मध्ये निधी मंजूर करणेत आला असून, सदरची कामे तातडीने पूर्ण करण्यात आली आहेत. सदर रस्ते हे ग्रामीण मार्ग असल्याने रस्त्यांची देखभाल दुरुस्ती जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून करण्यात येत असून रस्ते सुस्थितीत ठेवण्यात येतात.
(३) संबंधित कामांची वेळोवेळी तांत्रिक तपासणी करण्यात येत असून, दोषदायित्व कालावधीत आढळलेल्या त्रुटी कंत्राटदाराकडून विनाखर्च दुरुस्त करण्यात येतात. दोषदायित्व कालावधीनंतर रस्त्यांची

वार्षिक देखभाल दुरुस्ती जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून करण्यात येत असून रस्ते सुस्थितीत ठेवण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथील इरई नदी पात्रात गणेश विसर्जन कुंडाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केले असल्याबाबत

**(१७) * ९७१३ श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर महानगरपालिकेने इरई नदी पात्रात गणेश विसर्जन कुंडाचे केलेले बांधकाम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामाच्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या दिनांक ०६/०३/२०२३ रोजीच्या प्रशासकीय मान्यतेनुसार ई-निविदा प्रसिध्द करुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर योजना) सन २०२३-२४ निधी अंतर्गत इरई नदी पात्रात चंद्रपूर महानगरपालिकेमार्फत गणेश विसर्जन कुंडाचे काम करण्यात आले आहे. सदर काम दिनांक १५/०५/२०२४ रोजी कंत्राटदारामार्फत पूर्ण करण्यात आले असून कामाची स्थिती उत्तम आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुलुंड (मुंबई) येथे नवीन विकास नियंत्रण नियमावलीच्या अंमलबजावणीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) * ८८१८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड (मुंबई) येथील नवीन विकास नियंत्रण नियमावलीच्या (DCR) अंमलबजावणीत सुमारे २ हजार कोटी रुपयांच्या गृहनिर्माण गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी लेखापरीक्षण करण्याची घोषणा शासनाने माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत सुरु असलेल्या सर्व योजनांचा सदर लेखापरिक्षणात समावेश असून एका महिन्यात अहवाल सादर करण्याचे जाहीर करुनही अद्याप अहवाल सादर न करण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, विस्थापित गरीब व सामान्य कुटूंबांना ज्या प्रकल्पात घर देण्याचे विकासकांनी मान्य केले होते त्या सर्वच घरांची विक्री करण्यात आली असून त्यापैकी काही जागा या व्यापारी गाळे व वाणिज्य वापरासाठी देऊन सुमारे १० हजार कोटी रुपये एवढ्या रक्कमेची अनियमितता झाली असल्याने सबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी विकासक व संबंधित अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) मा.श्री.मिहीर कोटेचा, वि.स.स. यांनी विधानसभेच्या सन २०२६ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात दिनांक १७/०३/२०२६ रोजी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र. २९१२ वर विधानसभेत झालेल्या चर्चेच्या वेळी मा.राज्यमंत्री महोदय, नगरविकास यांनी प्रकरणी सविस्तर अहवाल ३० दिवसांत मागवून घेऊ, असे निवेदन केले होते.

मा.मंत्री महोदय यांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार अहवाल सादर करणेबाबत नगरविकास विभागाकडील दिनांक ३०/०३/२०२६ रोजीचे पत्राद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.

तद्नंतर नगरविकास विभागाकडून दिनांक २७/०५/२०२६ रोजी संबंधितांना स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. बृहन्मुंबई महापालिकेचा दिनांक १/०६/२०२६ रोजीचे पत्राद्वारे अहवाल प्राप्त झाला आहे. तथापि, प्रकरणी विस्तृत अहवाल आवश्यक माहितीसह सादर करणेबाबत नगरविकास विभागाने दिनांक ११/०६/२०२६ रोजीचे पत्राद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल प्राप्त होताच दिलेल्या आश्वासनानुसार बैठक घेण्याचे व नियमांचे उल्लघंन करणाऱ्या संबंधीतांवर नियमानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## नांदेड-उदगीर-बिदर राष्ट्रीय महामार्गावरील कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१९) * ९६५३ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड-उदगीर-बिदर राष्ट्रीय महामार्ग क्र.५० वरील अनेक बांधकामे अपूर्ण असतानाही बहाद्दरपुरा ते फुलवळ मार्गावर उभारण्यात आलेल्या टोल नाक्यामुळे तालुक्यातील मुख्यालयात किंवा शेजारच्या गावात जाण्या-येण्यासाठी परिसरातील ग्रामस्थांना टोल भरावा लागत असल्यामुळे असंतोषाची भावना निर्माण झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावरील बहाद्दरपुरा येथील मन्याड नदीवरील पुलाचे बांधकाम न झाल्यामुळे वाहतूक जुन्या व अरुंद पुलावरुन सुरु असून फुलवळ गावातील बसस्थानक परिसरात रस्त्याचे रुंदीकरण, दुभाजक, नाली आणि सर्व्हिस रोडची कामे अपूर्णावस्थेत असल्यामुळे “रस्ता अर्धवट आणि टोल पूर्ण” अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महामार्गावर कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे धोकादायक वळणावर अपघात होत असून “जोपर्यंत महामार्गाचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोल वसुली थांबवावी” अशी मागणी

नागरीकांकडून करण्यात येत असून त्वरीत निर्णय न घेतल्यास मोर्चा व रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर महामार्गावरील अपूर्ण कामांची चौकशी करुन अपूर्ण कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत तसेच कामास विलंब करणाऱ्या दोषी कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

नांदेड ते जळकोट रा.म.क्र. ५० या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या मूळ मंजूर वावामध्ये ६५.९५२ कि.मी. लांबीचे काम अंतर्भूत होते. या लांबीमध्ये बहाद्दरपुरा येथील मन्याड नदीवरील मोठ्या पुलाचे बांधकाम व २.५३ कि.मी. लांबीतील पुनर्आखणी समाविष्ट होती. पुनर्आखणीच्या भागातील जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना जमीन-धारकांनी जमिनीचा ताबा देण्यास नकार दिल्याने मूळ मंजूर वावानुसार काम करता आले नाही. त्यामुळे पुलाच्या कामासह पुनर्आखणी असलेली लांबी वगळून उर्वरित लांबीमध्ये रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले असून अस्तित्वातील बहाद्दरपुरा गावाजवळील जुन्या दुपदरी पूलावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

कामाचा दोष-दायित्व कालावधी संपुष्टात आल्यानंतर मूळ कंत्राटदारासमवेत करारनामा संपुष्टात येऊन दिनांक १५ एप्रिल २०२६ पासून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत फुलवळ गावाजवळ उभ्या करण्यात आलेल्या टोलनाक्यावर टोल वसुली सुरु करण्यात आली आहे. मूळ प्रकल्पातील एकूण ६५.९५२ कि.मी. लांबीपैकी ६३.१२९ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाल्याने केवळ ६३.१२९ कि.मी. लांबीकरीता टोल आकारणी करण्यात येत आहे.

(३) सदर महामार्गावर आवश्यक ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचे काम पूर्ण करण्यात आलेले असून टोल वसुलीविरोधात मोर्चा व रास्ता रोको आंदोलनाबाबत कोणतेही निवेदन राष्ट्रीय महामार्ग विभागास प्राप्त नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे (पू.) येथील कोपरी-कन्हैय्या नगर परिसरातील मलप्रक्रिया केंद्र कार्यान्वित करण्याबाबत

**(२०) * ९२९५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे (पूर्व) येथील कोपरी – कन्हैय्या नगर परिसरात उभारण्यात आलेल्या मलप्रक्रिया केंद्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करून शुध्द पाणी निर्मिती अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाला नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२० एमएलडी सांडपाणी शुध्द करण्याची क्षमता असलेल्या या प्रकल्पातून केवळ ५ एमएलडी पाणी शुध्द होत असून या प्रकल्पातून महानगरपालिकेला काहीही उत्पन्न मिळत नसताना तसेच

सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसतानाही संबंधित कंत्राटदारास दरवर्षी रुपये १० कोटी एवढी रक्कम अदा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईपर्यंत कंत्राटदारास कोणतेही देयक न देण्याबाबत तसेच उक्त प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

ठाणे (पूर्व) येथील कोपरी कन्हैया नगर परिसरात १२० MLD क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र कार्यरत असून सदर मलप्रक्रिया केंद्रात सांडपाण्यावर प्रक्रिया (Secondary Treatment) करण्यात येत आहे. सदर मलप्रक्रिया केंद्रातील सेकंडरी ट्रीटमेंट केलेल्या पाण्यावर Tertiary Treatment करण्याकरीता PPP तत्वावर ५ MLD क्षमतेचा Tertiary Treatment Plant उभारण्यात आला असून माहे जून, २०२५ पासून पूर्ण क्षमतेने म्हणजेच ५ MLD क्षमतेने कार्यान्वित करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.

कोपरी येथे कार्यरत असलेल्या १२० MLD क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रातून दैनंदिन प्राप्त होणाऱ्या सरासरी ६० ते ७० MLD सांडपाण्यावर प्रक्रिया (Secondary Treatment) करण्यात येत आहे. ठाणे महानगरपालिकेने PPP तत्त्वावर प्रकल्पाकरीता कोपरी येथील मलप्रक्रिया केंद्राचे (संलग्न मलउदंचन केंद्रासह) सर्व समावेशक परिचालन, निगा देखभाल व दुरुस्ती करणे (भाग-१) आणि वीज निर्मिती युनिट (Power Generation Unit) व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करणेकामी ५ MLD क्षमतेचा Tertiary Treatment Plant उभारणी करणे व चालविणे करीता ठेकेदाराने स्वखर्चाने DBFOT (Design, Built, Finance, Operate and Transfer) आधारे (भाग-२) एकूण २० वर्षे कालावधीकरीता मे. कोपरी वाया इंजिनिअरिंग प्रा. लि. या SPV ला दिनांक ०८ जुलै, २०२१ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे.

सदर प्रक्रिया केंद्राकरीता या पूर्वी नियुक्त ठेकेदार यांच्याकडून आहे त्यास्थितीत दिनांक ०५ सप्टेंबर,२०२२ रोजी सदर मलप्रक्रिया केंद्र मे. कोपरी बायो इंजिनिअरिंग प्रा. लि. या SPV च्या ताब्यात दिल्यानंतर सदर कामी सुरुवात करण्यात आली आहे.

त्यानुसार माहे जून, २०२५ मध्ये ५ MLD क्षमतेचा Tertiary Treatment Plant पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आला आहे. निविदा अटीशर्तीनुसार Tertiary Treated Water विकणेकरीता खरेदीदार ठेकेदारास शोधायचा आहे. जर खरेदीदार मिळाल्यास विक्री करुन पाण्यापोटी मिळणाऱ्या उत्पादनाच्या १० % रक्कम महापालिकेस द्यावयाची आहे. सद्य:स्थितीत ठेकेदार खरेदीदार नियुक्त करत आहे. त्यानुषंगाने ५०,०००/- लिटर खरेदीचा करारनामा माहे मे, २०२६ मध्ये केलेला आहे. त्यानुसार महापालिकेस उत्पन्न प्राप्त होणार आहे.

सदर PPP तत्वावरील कामी सवलती करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वार्षिक दर (Annuity) म्हणून रुपये १० कोटी एवढी रक्कम असून सदर रक्कमेतून वीज देयकातील वीज एककानुसार होणारी विजेची रक्कम कपात करण्यात येत असून उर्वरित रक्कम ठेकेदारास अदा करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चारकोप (कांदिवली) येथे कोस्टल मार्ग जोडणाऱ्या पुलाच्या बांधकामासाठी कांदळवनातील शेकडो झाडे तोडल्याबाबत

**(२१) * ९४१० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चारकोप (कांदिवली) परिसरात कोस्टल मार्गाचे काम सुरु असून चारकोप सेक्टर ८ टर्जन पॉईंट येथे पुलाचे बांधकाम करुन कोस्टल मार्ग जोडणाऱ्या पुलाच्या बांधकामासाठी कांदळवनातील शेकडो झाडे तोडली जात असल्यामुळे निसर्गचक्र, जैव विविधता धोक्यात येणार असल्याने स्थानिक नागरीक व पर्यावरणप्रेमी यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कांदळवनात स्लीप रोडसाठी बांधण्यात येणाऱ्या मार्गासाठी एकूण ४० पीलर उभारण्यात येणार असल्याने सध्या रोडवर असलेल्या १०० हून अधिक पर्जन्य वृक्ष बाधित होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पर्यावरण प्रेमी व स्थानिकांचा विरोध लक्षात घेऊन शासनाने सदर प्रकरणी कांदळवनाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कांदळवन तोडीसंदर्भात चारकोप परिसरातील स्थानिक रहिवाशी यांनी तसेच काही पर्यावरणप्रेमी यांनी विरोध केला आहे, ही बाब खरी आहे.
(२) अंशत: खरे आहे.

आराखड्यानुसार (Concept Plan) चारकोप सेक्टर ८ टर्जन पॉईंट येथे अंदाजे ४० पिलर प्रस्तावित आहेत. तेथे १४७ झाडे बाधित होत आहेत. सदर झाडे तोडण्यास वृक्ष प्राधिकरण, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक २९ मे, २०२६ च्या ठरावाने परवानगी दिली आहे. बाधित झाडांपैकी ४३ झाडे तोडण्याचे व उर्वरित १०४ झाडे ही स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

बाधित होणाऱ्या झाडांच्या बदल्यात पर्यायी ९४० झाडे महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम) यांच्यामार्फत पनवेल येथे लावण्याचे प्रस्तावित आहे.
(३) सदर प्रकल्पास सक्षम प्राधिकरण, मा.उच्च न्यायालय, मुंबई, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण, केंद्रीय पर्यावरण, वन मंत्रालय व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली, कांदळवन कक्ष, मुंबई यांच्याकडून आवश्यक त्या वैधानिक मंजुऱ्या विविध अटी व शर्तींसह प्राप्त झालेल्या आहेत.

वर्सोवा ते भाईंदर कोस्टल रोड प्रकल्पाची आखणी करताना विविध पर्यायी मार्गांचा तसेच अभियांत्रिकी पर्यायांचा सखोल अभ्यास करून कांदळवन व इतर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांवरील परिणाम कमीत कमी राहील, याची काळजी घेण्यात आलेली आहे.

प्रकल्पामुळे ८६.८६ हेक्टर कांदळवन क्षेत्र निष्कासित करण्यात येणार आहे. सदर कांदळवन वृक्षाची भरपाईसाठी ३ पट म्हणजेच २५५ हेक्टर जागेवर कांदळवन लागवड, अधिवास पुनर्स्थापना (Habitat Restoration), करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या मिळकत कर वसुलीस स्थगिती दिल्याबाबत

**(२२) * ८७५१ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या मिळकत कर वसुलीस शासनाने स्थगिती दिली असतानाही पुणे महानगरपालिकेने शासनाने जे कर आकारणीचे आदेश दिले होते त्यानुसार कर आकारणी केली नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेकडून रस्ता, पाणी, सांडपाणी, वीज आदी सुविधा मिळत नसताना कर जास्त घेतला जात असल्याने या गावांमधील नागरिक संतप्त झाले असून, सदर गावांमधील ग्रामपंचायतीच्या कराच्या दुप्पट कर आकारणीबाबत पुनर्विलोकन होईपर्यंत महानगरपालिकेने करवसुली थांबवावी असे नगरविकास विभागाने पत्राद्वारे महानगरपालिकेस आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर भरायचा किंवा नाही याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून शासन आणि महानगरपालिकेने तात्काळ यावर तोडगा काढावा अशी मागणी महानगरपालिकेच्या विरोधी पक्षांच्या गटनेत्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्देशांच्या अनुषंगाने अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले असून दोन वर्षांपासून समाविष्ट ३२ गावांच्या मिळकत कराचा प्रश्न निकाली काढण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल तात्काळ सादर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

शासनाने वसुलीसाठी स्थगितीचे आदेश दिले आहेत. कर आकारणीसाठी स्थगिती नाही. मिळकतधारकांनी स्वतः PT-१ अर्ज स्वेच्छेने आकरणीसाठी अर्ज केल्यास नविन मिळकत कर आकारणी करण्यात येते.

(२) अंशत: खरे आहे.

तथापि, पुणे महानगरपालिकेमार्फत ३२ गावातील पायभूत सुविधांअंतर्गत विद्युत विभागामार्फत सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात १७४८ एफ.आर.पी. पोल व सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात १६६६ एफ.आर.पी. व जी.आय.पोल उभारुण प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, मागील वर्षात पाणीपुरवठा सुविधांकरीता रुपये ३५१.१५ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच, सन २०१६ ते सन २०२६ पर्यंत सदर ३२ गावांतील रस्त्यांकरीता रुपये ११६२१.९१ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच मलवाहिन्यांचे जाळे तयार करण्यासाठी नवीन आराखडा तयार करण्याचे नियोजित आहे. आतापर्यंत सुमारे २०० किलोमीटर लांबीच्या विविध व्यासाच्या मलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईत एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्क उभारण्यात येत असल्याबाबत

**(२३) * ८६६६ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्यानंतर कार्गो वाहतुकीत मोठी वाढ झाली असून शहरात राष्ट्रीय स्तरावरील एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्क उभारणीसाठी सिडको प्रशासनाने प्राथमिक टप्प्यात रुची अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) मागविण्यात आला असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोकडून राबविण्यात येणारा हा प्रकल्प जवाहरलाल नेहरू बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबई ट्रान्स हार्बर लिंक यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांच्या दळणवळणाचा लाभ घेत शहराच्या आर्थिक विकासाला चालना देणार असून अधिकृत लॉजिस्टिक्स हब उभारल्याने परिसरातील अनधिकृत गोदामांना आळा बसणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबईला राष्ट्रीय स्तरावरील एकात्मिक लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून स्थापित करण्याकरीता स्थानिक उद्योग, MSME आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील उद्योजकांना या प्रकल्पामध्ये सहभागी होण्यासाठी सवलती किवा संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तसेच कार्यक्षम मालवाहतूक, गुंतवणूक वाढ आणि आर्थिक विकासाला चालना मिळावी याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सिडकोमार्फत टप्पा-१ अंतर्गत एप्रिल-२०२६ रोजी १७४ एकर एवढ्या क्षेत्रावर ४ ते ४० एकर आकाराच्या भूखंडासाठी “रुची-अभिव्यक्ती प्रस्ताव” (EOI) आणि निविदा मागविल्या आहेत. सदरभूखंड सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील (MSME) लॉजिस्टीक कंपन्यांसाठी उपयुक्त ठरणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * ९५५७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावी ते फैजपूर (जि.जळगाव), तांदलवाडी-गाते (ता.रावेर), मंगरूळ ते शिरूड (ता.अमळनेर) तसेच बामणोद-राजोरा (जि.जळगाव) दरम्यानच्या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व दोषपूर्ण झाल्याने दोनच वर्षांत रस्त्यांची दुरवस्था झाली असून वारंवार दुरुस्ती करूनही महामार्गावरील खड्‌डे भरून निघत नसल्याची तसेच दुरुस्ती अपुर्णावस्थेत असल्याची बाब दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील वाढती वाहतूक, अवजड वाहनांची वर्दळ यामुळे वाढलेल्या अपघातांमुळे या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात आले, परंतु सदर महामार्ग सुविधेपेक्षाही धोकादायकच अधिक बनला असून वारंवार अपघात होत असल्यामुळे प्रवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील न्हावी ते फैजपूर, तांदलवाडी-गाते तसेच मंगरूळ ते शिरूड (जि.जळगाव) दरम्यानच्या रस्त्यांचे संपूर्ण डांबरीकरण करुन व दुरुस्तीचे काम दर्जेदार पध्दतीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.
१. न्हावी ते फैजपुर रस्ता ग्रा.मा.१४ दर्जाचा आहे.
२. तांदलवाडी-गाते रस्ता प्र.जि.मा.७४ दर्जाचा आहे. सदर रस्त्याचे काम प्रगतीत असून सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.
३. मंगरूळ ते शिरूड रस्ता प्र.जि.मा.१२९ दर्जाचा असून सद्य:स्थितीत सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम प्रगतीत आहे.
४. बामणोद-चिखली-राजोरा रस्ता ग्रा.मा.०९ व ग्रा.मा.७४ दर्जाचा आहे.
उपरोक्त रस्त्यांवर चौपदरीकरणाची कामे प्रगतीत नाहीत.
(२) हे खरे नाही.

तथापि, रस्त्यांची गरजेप्रमाणे वेळोवेळी दुरुस्ती करुन रस्ता सुस्थितीत ठेवण्याचे नियोजन करण्यात येते.

(३) न्हावी ते फैजपुर रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत ग्रामविकास विभागामार्फत मंजुरीस्तव प्रस्तावित आहे.

तांदलवाडी-गाते व मंगरूळ ते शिरूड रस्त्यांवर कामे मंजूर असून निविदेतील तरतुदीप्रमाणे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## अल्पसंख्यांक विकास विभागासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२५) * ९३०५ श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्यांक समाजाच्या उन्नतीसाठी अल्पसंख्यांकबहूल क्षेत्रात सोई-सुविधा, अल्पसंख्यांक शिक्षण संस्था/ शाळा यांना मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी गतवर्षी निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे राज्यातील अल्पसंख्यांक समाजात असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात अल्पसंख्यांक विकास विभागासाठी निधीची तरतूद करण्यात आली असून आर्थिक सर्वेक्षणानुसार चालू आर्थिक वर्षात (माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत) अल्पसंख्याक कल्याणासाठी मंजूर निधीपैकी ५०% पेक्षा कमी निधी वापरला गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनामार्फत अर्थसंकल्प २०२६-२०२७ मध्ये अल्पसंख्याकांच्या विकासाकडे दुर्लक्ष करण्यात आले असून, केंद्रीय स्तरावरही अल्पसंख्याक मंत्रालयाच्या योजनांसाठी निधी वाटप व खर्चात कपात झाल्याचे संसदीय समितीच्या अहवालात दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने अल्पसंख्यांक विकास विभागाच्या विकासासाठी व विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे खरे नाही.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात सोई-सुविधांकरीता अल्पसंख्याक बहुल ग्रामिण तसेच नागरी क्षेत्रविकास योजनेंतर्गत एकूण रुपये ४५९.०८ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच अल्पसंख्याक बहुल भागातील शासनमान्य खाजगी अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शाळा व महाविद्यालये तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्यामध्ये पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सुरु असलेल्या योजनेंतर्गत रुपये १.०२ कोटी निधी तसेच अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी एकूण रुपये ८८.०० कोटी एवढा निधी वितरित केला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता अल्पसंख्याक विकास विभागाच्या कार्यक्रमाकरीता एकूण रुपये १२०१.४४८ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद (मूळ अर्थसंकल्पित +पुरवणी मागणी) होती. त्यापैकी वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या रुपये ११२६.३०५ कोटी पैकी मार्च २०२६ अखेर रुपये ९४७.८६ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला असून खर्च करण्यात आलेल्या निधीचे प्रमाण ७८.८ % इतके आहे.
(३) व (४) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रुपये ८४४.४८ कोटी इतका नियतव्यय विभागास प्राप्त झाला असून सर्व निधी अल्पसंख्याक विकास विभागाच्या विविध योजनांकरीता अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

त्यानुसार, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या सर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी एकूण रुपये १०१.५८ कोटी एवढी तरतूद केली आहे.शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना “महाशिष्यवृत्ती” या एकात्मिक संगणकीय प्रणालीद्वारे MahaDBT २.० पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने सदर योजना राबवावयाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये महिलांकडून जादा शुल्काची आकारणी केली जात असल्याबाबत

**(२६) * ९५४६ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसारख्या शहरात सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर करणाऱ्या महिलांकडून पुरुषांच्या तुलनेत अधिक शुल्क बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आकारले जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासिक पाळी किंवा जैविक गरजांमुळे महिलांना स्वच्छतागृहांचा वापर अधिक वेळ करावा लागतो त्यामुळे महिलांकडून अधिक शुल्क आकारले जात असून, सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये सुरक्षिततेचा अभाव, विद्युत सुविधा नसणे, तुटलेले दरवाजे आणि पाण्याची कमतरता यासारख्या सोयी सुविधांअभावी गंभीर समस्या उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राईट टू पे मोहिमेंतर्गत महिलांसाठी स्वच्छतागृहांची मोफत सेवा देण्याची मागणी होत असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने ही सेवा मोफत देणे शक्य नसल्याची भूमिका घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने महिलांच्या आरोग्यासाठी सर्व सार्वजनिक शौचालयामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आणि शुल्क आकारणीमध्ये समानता आणण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर करणाऱ्या महिलांकडून पुरुषांच्या तुलनेत अधिक शुल्क बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आकारले जात असल्याची बाब खरी नाही.
(२) हे खरे नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणामध्ये शौचालयासाठी Pay and Use असे धोरण असून धोरणानुसार सर्वांकरीता Urinal (मुत्रालय) साठी नि:शुल्क व्यवस्था आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामुदायिक शौचालये व सार्वजनिक शौचालय वापराच्या धोरणानुसार महिला व पुरुष यांच्याकरीता समान शुल्क आकारण्याची तरतूद आहे. त्यामुळे यासंदर्भात स्वतंत्र कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील फुडलँड कंपनी चौक, रोडपाली येथे उड्डाणपूल उभारण्याबाबत

**(२७)** * **९३५६ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील फुडलँड कंपनी चौक, रोडपाली या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्यामुळे अपघातांची संख्या वाढली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उड्डाणपूल उभारण्याबाबतचा नवीन प्रस्ताव मागविण्यासाठी शासन स्तरावर सकारात्मक कार्यवाही सुरु असून, सदर उड्डाणपूल उभारणीसाठी आवश्यक तांत्रिक सर्वेक्षण/व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report) तयार करण्यात आला असून त्यासाठीचे अंदाजपत्रक देखील शासनाकडे सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पनवेल महानगरपालिका हद्दीत उड्डाण पूल उभारण्याचा प्रस्ताव तातडीने मान्य करुन फुडलँड कंपनी चौक, रोडपाली या ठिकाणी होणारी प्रचंड वाहतूक कोंडी दूर करुन उड्डाण पूल उभारण्याबाबत मान्यता देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ अंतर्गत निगडी (भक्ती शक्ती चौक) ते शिळफाटा मार्ग केंद्रिय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांच्या अखत्यारीत असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे सवलतदार म्हणून महामार्गाचे काम करीत आहेत. मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ या महामार्गावरील वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी या महामार्गाचे सहापदरीकरण करणे तसेच ठिकठिकाणी उड्डाणपूल बांधणे इ.बाबतचा प्रस्ताव महामंडळाकडून केंद्रिय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांना सादर करण्यात आलेला आहे. याबाबत केंद्र शासनाशी नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर प्रस्तावामध्ये पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील फुडलँड कंपनी चौक, रोडपाली येथील उड्डाणपुलाचे काम समाविष्ट आहे.

दिनांक ०६/०३/२०२६ रोजी मा.केंद्रिय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग महोदयांनी पुणे जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या आढावा बैठकीमध्ये मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ (निगडी ते शिळफाटा) या मार्गाचे सहापदरीकरण तसेच वाहतूक कोंडीच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार उड्डाणपूले उभारण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सदर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील मे.दि नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. कंपनीकडे कोट्यवधी रुपयांची थकबाकी असल्याबाबत

**(२८) * ८८१४ ॲड.अनिल परब, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.दिनांक नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. यांनी उल्हासनगर नागरी समुहातील मौजे आंबिवली मोहने, अटाळी, गाळेगांव आणि वडवली (ता.कल्याण) येथील एनआरसी कंपनीच्या मालकीच्या मिळकतीमधील अतिरिक्त करण्यात आलेले १४२३२२७.३९ चौ.मी. क्षेत्राला औदयोगिक वापरासाठी सुटीचे आदेश अंमलात असतानाही सदर कंपनीने मे.रहेजा युनिव्हर्सल प्रा.लि समवेत अनधिकृतपणे करार केल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेत्र ७/१२ उताऱ्यातील कागदोपत्री अदानी कंपनीच्या नावे नसतानाही विनापरवानगी त्यावर अनधिकृत बांधकाम केले असून सदर जमिनीचे ७/१२ चे इतर हक्कमध्ये “ अनधिकृत व्यवहार” अशी नोंद असतानाही रेल्वे मार्गिका तयार करणे, सिमेंट फॅक्टरी उभारण्याची कामे करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एनआरसी कंपनीकडे येथील महानगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रुपये ३०० कोटी रुपयांहून अधिक थकबाकी असणे, कर्मचाऱ्यांची देणी थकीत असतानाही कंपनीने अनधिकृत व्यवहार केल्याचे तसेच एनआरसीचे भूखंड खरेदी करणाऱ्याना “ना हरकरत” प्रमाणपत्र देण्यात आल्याचे दिनांक

२२ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एनआरसी कंपनीला देण्यात आलेले पाणी कनेक्शन तात्काळ खंडीत करणे, थकबाकीची तातडीने वसूली करणे व दिलेल्या सर्व परवानग्या तातडीने रद्द करण्यासह उक्त थकबाकीस जबाबदार असणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मौजे आंबिवली येथील मे. दि नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. ची जागा मंजूर विकास योजनेत I-२ झोनमध्ये समाविष्ट आहे. कंपनीने काही क्षेत्रावर वेअरहाऊस बांधकामासाठी प्रस्ताव सादर केला होता.फेरफार नोंद क्र. १०९४ नुसार, १४,२३,२२७.२९ चौ.मी. अतिरिक्त क्षेत्राबाबत BIFR ने १६/०७/२००९ रोजी कंपनीला आजारी उद्योग घोषित केले असून हा आदेश AIFR ने कायम ठेवला. त्याविरोधातील रिट याचिका क्र. ६४५०/२०१० मध्ये उच्च न्यायालयाने २९/०७/२०११ रोजी रहेजा युनिव्हर्सल प्रा. लि. सोबतचा करार विक्री करार असून खरेदीखत नसल्याचे स्पष्ट केले, ज्यास सर्वोच्च न्यायालयाने ०७/०२/२०१२ रोजी दुजोरा दिला. तसेच सदर करार परस्पर संमतीने रद्द झाल्याने जमिनीच्या इतर हक्कातील "अनधिकृत व्यवहार" ही नोंद कमी करण्यात आली आहे.
(२) एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली विनियम क्र. १४.११ अंतर्गत Integrated Logistic Park तरतुदीनुसार ०३ वेअर हाऊससाठी १,४६,३३५.०० चौ.मी. क्षेत्राकरीता १९/०४/२०२३ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली. त्यापैकी एका वेअरहाऊसचे ५५,१३४.५२ चौ.मी. बांधकाम पूर्ण झाल्याने ०१/०२/२०२४ रोजी भाग बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यात आला. मंजूर परवानगीपेक्षा अधिक बांधकाम झालेले नाही तसेच जागेवर कोणतेही अनधिकृत बांधकाम आढळलेले नाही. सिमेंट फॅक्टरीसाठी महानगरपालिकेने कोणतीही परवानगी दिलेली नाही.
(३) अंशत: खरे आहे.

नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलकडे विहित मुदतीत मालमत्ता कराची थकबाकी महानगरपालिकेने न कळविल्यामुळे सदर रक्कम वसुल झालेली नाही. याबाबतीत चौकशी समितीच्या अहवालानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) मा.समिती प्रमुख, आश्वासन समिती यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एन. आर. सी कंपनीच्या थकीत मालमत्ता कराची वसुली करण्याच्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिका स्तरावर एक चौकशी समिती स्थापन करुन सदर समितीने त्यांचा चौकशी अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एन. आर.सी कंपनीचा थकीत मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त-२, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आलेली असून समितीचा अहवाल प्राप्त होताच याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरातील गाळ्यांच्या भाडे वसुलीत अपहार झाल्याबाबत

**(२९) * ८८५७ श्री.पंकज भुजबळ, श्री.संजय खोडके, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या पुनर्रचित इमारतीसह संक्रमण शिबिरामधील गाळेधारकांकडून सन २०१५ ते २०२३ या कालावधीत भाडे वसुली करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रुपये ५ कोटी ७० लाख एवढ्या रकमेचे भाडे वसूल केले असल्याचे दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे भाडे म्हाडाच्या खात्यात न भरता कर्मचारी व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अपहार केल्याचे विभागाने केलेल्या चौकशीत निदर्शनास आले असून रहिवाशांना दिलेली पावती आणि म्हाडा रेकॉर्डमधील रकमेत मोठी तफावत आढळली असून याबाबत दादर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द पोलिसांनी तसेच गृहनिर्माण विभागामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) श्री.जगदीश धार्मिक, भाडेवसुलीकार, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी सन २०१५ ते २०२३ या कालावधीत रुपये ५.७० कोटी इतक्या रकमेचा अपहार केल्याचे निर्दशनास आले असून, श्री.धार्मिक यांचेविरूध्द दादर पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक १२/०३/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलीसांकडून कायदेशीर कारवाई सुरु असून, संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द गाळेधारकांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीअंती महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने त्यांना दिनांक १०/०७/२०२३ रोजी निलंबित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपळस ते येवला (ता.निफाड, जि.नाशिक) महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३०) * ९०१९ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळस रामाचे ते येवला महामार्ग (नाशिक-येवला राज्य महामार्ग) चौपदरीकरण आणि सिमेंट कॉंक्रीटीकरण प्रकल्पाचे सध्या सुरू असलेले काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला व निफाड तालुक्यासाठी सदर महामार्ग अत्यंत महत्त्वाचा असून रस्त्याची जाडी, दर्जा आणि तांत्रिक मानकांचे (Technical Standards) पालन न केल्याप्रकरणी स्थानिक नागरिक व

लोकप्रतिनिधींनी यापूर्वी वेळोवेळी आंदोलने व निवेदने दिली असून या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) गुणवत्ता नियंत्रण कक्षाकडून (Vigilance & Quality Control) तांत्रिक तपासणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तांत्रिक तपासणीमध्ये काही त्रुटी आढळल्यास सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या कंत्राटदार, अभियंते अथवा अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाईची प्रक्रिया करुन नाशिक-येवला महामार्गाचे (पिंपळस रामाचे मार्गे) चौपदरीकरण आणि सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम उच्च दर्जाचे व सुरक्षित पध्दतीने पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

सदर महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत स्थानिक नागरिकांकडून एप्रिल, २०२६ मध्ये सूचना व निवेदने प्राप्त झाली आहेत. परंतु, सदर काम विहित मापदंडानुसार प्रगतीपथावर आहे.

(२) होय, हे खरे आहे.

अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांनी प्रत्यक्ष साइटवर भेट देऊन कामाची पाहणी केली आहे व कामाच्या गुणवत्तेबाबत कुठल्याही प्रकारची गंभीर नोंद घेण्यात आली नसून काम निविदा शर्ती प्रमाणे व विहित मानकांप्रमाणे प्रगतीत आहे.

(३) सदर कामावर सतत व बारकाईने पर्यवेक्षण करण्याचे तसेच साहित्याच्या नियमित चाचण्या घेण्याचे सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## अमरावती येथील छत्री तलाव परिसरातील १३ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(३१)** * **९७२७ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील ऐतिहासिक छत्री तलावाच्या उच्च पूररेषेपासून ५० मीटरच्या प्रतिबंधित क्षेत्रात १३ अनधिकृत बांधकामे केल्याचे राष्ट्रीय हरित लवादासमोर (NGT) माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामांबाबत अमरावती महानगरपालिकेने न्यायालयात सादर केलेले नकाशे आणि प्रतिज्ञापत्र यात विसंगती आढळल्या असून छत्री तलाव परिसरातील १३ बांधकामे पर्यावरणाच्या दृष्टीने घातक असूनही ती निष्कासीत करण्याबाबत महानगरपालिका आणि महाराष्ट्र राज्य पाणथळ प्राधिकरण दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती येथील छत्री तलावाच्या संरक्षणासाठी प्रतिबंधित क्षेत्रातील १३ अनधिकृत बांधकामे त्वरित निष्कासीत करण्यासाठी राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या आदेशाचे पालन होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महानगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सोई सुविधांचा विकास योजनेंतर्गत हाती घेण्यात आलेल्या छत्री तलाव सौंदर्यीकरण व परिसरातील सुभोभिकरण प्रकल्पाबाबत पोहरा बचाव समिती यांनी मा.राष्ट्रीय हरीत प्राधिकरण, पुणे येथे O.A.No.९१/२०१९ अन्वये तक्रार दाखल केली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

मा.राष्ट्रीय हरीत प्राधिकरण यांनी सदर प्रकरणी दिनांक २८/०४/२०२६ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये अमरावती महा नगरपालिका व राज्य पाणथळ प्राधिकरण यांना वस्तुस्थितीदर्शक शपथपत्रे दाखल करण्याबाबत निर्देशित केले आहे. सदर आदेशानुसार राज्य पाणथळ प्राधिकरण व महानगरपालिकेतर्फे शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट असून पुढील सुनावणी दिनांक ०५/०८/२०२६ रोजी नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील जायखेडा ते ताहराबाद मार्गावरील हजारो झाडे विनापरवानगी तोडणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत

**(३२) * ९८३४ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील जायखेडा ते ताहराबाद मार्गावरील (ता.बागलाण) रस्ते रुंदीकरणाच्या कामासाठी शंभर ते दीडशे वर्षांपूर्वीची असलेली आंब्याची, लिंबाची व वडाची झाडे ठेकेदाराने तोडली असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम चालू असताना बाधित न होणारी झाडेही ठेकेदाराने तोडली असून जायखेडा ते ताहराबाद दरम्यानची किती झाडे तोडण्याची परवानगी ठेकेदाराला मिळाली होती तसेच ठेकेदाराने आर्थिक नफ्यासाठी सदर झाडांची कत्तल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जायखेडा-ताहराबाद रस्ता रुंदीकरणात अडथळा नसलेल्या वृक्षांची देखील कत्तल करण्यात आली असून शेकडो वर्षांची वृक्षसंपदा संपुष्टात आल्यामुळे जायखेड्यातील जनतेमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जायखेडा ते ताहराबाद मार्गावरील रस्त्याची शंभर ते दीडशे वर्षांपूर्वीच्या हजारो झाडे तोडणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदरील रस्त्याच्या रूंदीकरणासाठी काही झाडे क्षतीग्रस्त झाली आहेत. परंतु, ही झाडे शंभर ते दिडशे वर्षांपुर्वीची नाहीत.
(२) हे खरे नाही.

सदरील रस्त्याचे काम करताना केवळ बाधित होणारी झाडेच वन विभागाच्या परवानगीने विहित प्रक्रिया राबवून काढण्यात आली आहेत.

तसेच एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे लागवड करुन संगोपन करण्याबाबत कंत्राटदारांकडून हमीपत्र घेण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वर्धा यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याबाबत

**(३३) * ९९७३ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी निविष्ठा (बियाणे) पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून निकृष्ट/भेसळयुक्त बियाणे पुरवठा झाल्यास ग्राहक तक्रार निवारण आयोगामार्फत भरपाई देण्याची तरतूद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्राहक तक्रार क्र. ४२/२०२१ मध्ये मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वर्धा यांनी दिनांक २० जून, २०२५ रोजी किसान ॲग्रो सिड्स यांना दिलेल्या आदेशानुसार तक्रारकर्त्यास रुपये ७०,०००/- व त्यावर ९% व्याज तसेच मानसिक व आर्थिक भरपाई व खर्च देण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदेशानंतरही संबंधित कंपनीने आदेशाची पूर्तता न केल्याने आदेशाची अंमलबजावणी प्रलंबित असून अशा प्रकरणांमध्ये रक्कम वसुली व आदेश अंमलबजावणीसाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत काय,
(४) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी न होण्याची कारणे कोणती आहेत व भविष्यात तकार निवारण ग्राहक आयोगाच्या आदेशांची तातडीने अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) ग्राहक आयोगाच्या निर्णयानंतर जर विरुध्द पक्षकाराने आदेशाची पुर्तता केली नाही तर ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ मधील कलम ७१ व ७२ अन्वये मूळ तक्रारकर्त्याला वसूली केस आयोगात दाखल करावी लागते. त्यानुसार कायदेशीर कार्यवाही केली जाते.
(४) तक्रारकर्त्याने वसूली अर्ज दाखल केल्यानंतर पुढील कार्यवाही संबंधित आयोगाकडून करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या पूरक पोषण आहारामध्ये काच व प्लास्टिकचे तुकडे सापडल्याबाबत

**(३४) * ९९७६ श्री.झीशान सिद्दिकी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजन योजना सुरु करण्यात आली असून अतिरिक्त पोषण आहाराकरीता शासनामार्फत रुपये १६५ कोटींच्या निधीच्या तरतुदीनूसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील ३ लाख १० हजार विद्यार्थ्यांसाठी पूरक पोषण आहार म्हणून तीन प्रकारचे सुवासिक एनर्जी बार (न्युट्रीबार) देण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आणि पोषण आहाराचा एक भाग असलेल्या सदर न्यूट्रीबारमध्ये काचा, दगडाचे व प्लास्टिकचे तुकडे सापडल्याचे दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपआयुक्त, शिक्षण विभाग यांना याप्रकरणाची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशी अहवालानुसार संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्वच शाळांतील विद्यार्थ्यांना सकस व पौष्टिक आहार मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे त्यांच्या शाळेतील बालवाडी ते इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना पुरक पोषण आहार म्हणून एनर्जी बारचा पुरवठा करण्याबाबतची योजना माहे फेब्रुवारी, २०२६ पासून सुरु करण्यात आली.
(२) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना दिनांक ७ फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक १६ मार्च, २०२६ या कालावधीत पुरविण्यात आलेल्या एनर्जी बारमध्ये दोरा, रबरी तुकडे, दगडाचे बारीक कण, खिळा, लोखंडी तुकडा, हँडग्लोव्हजचा तुकडा इत्यादी आढळून आल्याचे तसेच एनर्जी बारची वैधता संपुष्टात आल्याच्या ७ शाळांकडून शिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या.
(३) हे खरे आहे.
(४) सदर एनर्जी बार पुरवठादार मे.गुणीना कमर्शियल प्रा.लि. यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. कंत्राटदारामार्फत निकृष्ट दर्जाचे तसेच वैधता संपलेले एनर्जी बार बदली करुन देण्यात आलेले आहेत. तसेच संबंधित कंत्राटदार यांना एनर्जी बारमध्ये आक्षेपार्ह घटक आढळणार नाहीत, याची दक्षता घेण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कळविण्यात आले आहे. तसेच विद्यार्थांना एनर्जी बार वाटप करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे कार्यपध्दती (SOP) सर्व शाळांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
त्यानंतर पुरवठादाराने पुरवठा केलेल्या एनर्जी बारबाबत तक्रार प्राप्त झाली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुस्लिम समाजास ५ टक्के आरक्षण देण्याबाबत

**(३५) * ८८३४ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लीम समाजास शासनाने शासकीय भरतीमध्ये आणि शिक्षणात दिलेले ५ टक्के आरक्षण मा.उच्च न्यायालयाने सन २०१४ मध्ये कायम ठेवले होते परंतु, मा.उच्च न्यायालयाच्या या निकालाचे पालन करण्याऐवजी राज्य शासनाने आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम समाजासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये तसेच शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण लागू करण्यात आलेले होते, परंतु सन २०१४ च्या दोन अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे त्याबाबतचा अध्यादेश व्यपगत झाल्याने मुस्लिम समाजासाठीचे आरक्षण रद्द झाले असल्याचे दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत मा.उच्च न्यायालयाने राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसंस्थेमधील सरळसेवा प्रवेश नियुक्त्यांमधील विशेष मागासवर्ग प्रवर्ग “अ” करीता राखून ठेवण्याच्या तरतुदीस दिलेल्या अंतरिम स्थगितीमुळे मुस्लिम समाजास ५ टक्के आरक्षणामुळे मिळणारी संधी वाया जाण्याची भिती निर्माण झाल्यामुळे शासनाने दोन्ही सभागृहात पुन्हा त्याबाबतचे विधेयक आणून मुस्लिम समाजास न्याय मिळवून आरक्षण कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९/०७/२०१४ रोजीच्या अध्यादेशान्वये (सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४) विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category-A) करीता शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.त्यास अनुसरुन मुस्लिम समाजास (विशेष मागास प्रवर्ग-अ) जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासन निर्णय दिनांक २२/०७/२०१४ व शासन परिपत्रक दिनांक २८/०८/२०१४ निर्गमित करण्यात आले होते. तथापि, सदर अध्यादेशाचे दिनांक २३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासन निर्णय दिनांक १७/०२/२०२६ अन्वये, सदर अध्यादेशाच्या पार्श्वभूमीवर निर्गमित करण्यात आलेले उक्त शासन निर्णय/शासन परिपत्रक रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) सन २०१४ चा सामान्य प्रशासन विभागाचा अध्यादेश क्र.१४, दिनांक ०९/०७/२०१४ हा दिनांक २३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने सदरहू अध्यादेश व्यपगत झाला आहे. तथापि, दिनांक ०९/०७/२०१४ ते दिनांक २३/१२/२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश तसेच दिनांक ०९/०७/२०१४ ते दिनांक १४/११/२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या अबाधित ठेवण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील १२ जलकुंभ उभारणीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३६)** * **८७६५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अमृत योजनेतून २७४० कोटी रुपये खर्च करुन राबविण्यात येत असलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम मागील सहा महिन्यांपासून प्रलंबित असून पहिल्या टप्प्यात २०० एमएलडी अतिरिक्त पाणी आणण्याची प्रक्रिया सुरू असून १२ जलकुंभ उभारणीपैकी फक्त ३ जलकुंभांची चाचणी सुरु असून ५ जलकुंभाची कामे अपुर्णावस्थेत तसेच ४ जलकुंभाच्या उभारणीचे काम सुरु झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नक्षत्रवाडी एमबीआर ते जलकुंभापर्यंतच्या जलवाहिनीची जोडणी आणि जलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झालेले नसतानाही, महानगरपालिका प्रशासनाने येथील पंपगृहासाठी उच्चदाबाची वीज जोडणी केवळ चाचणीसाठी घेतल्यामुळे महानगरपालिकेला मागील दोन महिन्यांत १ कोटी १० लाख रुपयांचे वीज देयक भरावे लागले असून दरमहा ३० ते ३५ लाख रुपयांचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड बायपास, देवळाई सातारा परिसर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीत समाविष्ट होऊन दहा वर्षे पूर्ण झाली असूनही छत्रपती संभाजीनगर येथील सातारा-देवळाई परिसरातील जलकुंभ उभारणीचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे ५ लाख लोकसंख्या असलेल्या या महानगरपालिका हद्दीतील रहिवाशांना आठ ते दहा दिवसांनी पाणी मिळत असून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने महानगरपालिकेस अधिकचा आर्थिक भार पडत आहे, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, शहरातील सातारा-देवळाई परिसरात अनेक भागांत पाण्याची टंचाई कायम असून ज्या भागांत नळजोडणी आहे, तेथे महानगरपालिकेने तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा अशी मागणी स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सातारा-देवळाई परिसरासाठी नियोजित असलेले १२ जलकुंभांचे काम तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने जलवाहिनीवरील गॅप जोडण्याचे आणि जलशुद्धीकरण केंद्राचे काम तातडीने पूर्ण करून शहरास पाणीपुरवठा नियमित सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत छत्रपती संभाजीनगर शहराच्या रुपये २७४०.७५ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी प्रदान करण्यात आली असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील योजनेची कार्यान्वयन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आहे.

सदर प्रकल्पातील पहिल्या टप्प्यात २०० द.ल.ली. शहरास पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यादृष्टीने कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच, सातारा-देवळाई परिसरातील १२ जलकुंभापैकी ४ जलकुंभाची चाचणी पूर्ण झाली असून १ जलकुंभाची चाचणीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, ३ जलकुंभाच्या आरसीसीची कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित ४ जलकुंभ उभारणीचे काम सुरू करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(२) छत्रपती संभाजीनगर शहरातील पाणीपुरवठा प्रकल्पातील जलशुद्धीकरण केंद्राचे २०० द.ल.लि. पाणीपुरवठा कार्यान्वित करणे गरजेचे असल्याने जलवाहिनीची चाचणी घेणे, जलवाहिनी साफ करणे तसेच, विद्युत पंप व इतर आनुषंगिक उपकरणांची चाचणी घेऊन विद्युत पुरवठा सुरळीत करणे आवश्यक ठरते. त्यामुळे, २०० द.ल.लि. योजना अंशतः कार्यान्वित करून वाढीव पाणीपुरवठा करणे आवश्यक

असल्यामुळे व सदर योजनेत विद्युत देयकाचा खर्च समाविष्ट केलेला नसल्यामुळे सदरील खर्च महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असून त्यामुळे कोणत्याही प्रकारचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागलेला नाही.

तसेच, महानगरपालिकेने महावितरणच्या मानकानुसार विद्युत भार मंजूर करून घेतलेला आहे. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येणारी मागणी व उचलणारे पाणी परिमाण लक्षात घेता महानगरपालिकेमार्फत विद्युत भार तात्पुरत्या स्वरूपात कमी करून घेण्याचे नियोजन असल्याचे आयुक्त, संभाजीनगर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) व (४) सातारा देवळाई हा परिसर महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट असून ग्रामपंचायत भागात पर्याप्त वितरण व्यवस्था नव्हती. त्यामुळे, सदरील भागाचा महानगरपालिकेत समावेश झाल्यानंतर उपलब्ध वितरण व्यवस्था व पारंपरिक जलस्त्रोताचा वापर करून पाणीपुरवठा केला जातो. सदरील भागातील प्रचलित अपुरी वितरण व्यवस्था व कमी व्यासाच्या जलवाहिन्या असल्यामुळे नागरिकांना ६ ते ७ दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येतो तसेच, या भागातील नागरिक त्यांच्या विहिरी / बोअरवेल / हँडपंप द्वारे पाणी उपलब्ध करून घेतात ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, शहरासाठी प्रस्तावित अमृत २.० योजनेत या भागासाठी १२ जलकुंभ नियोजित करण्यात आली आहेत. भविष्यात अमृत २.० अंतर्गत प्रगतीपथावरील योजना पूर्ण झाल्यानंतर सदरील परिसरात नियमित पाणीपुरवठा करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(५) सातारा - देवळाई परिसरातील १२ जलकुंभापैकी ४ जलकुंभाची चाचणी पूर्ण झाली असून १ जलकुंभाची चाचणीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, ३ जलकुंभाच्या आरसीसीची कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित ४ जलकुंभ उभारणीचे काम सुरू करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच, प्रस्तुत छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेतील एकूण ५० जलकुंभापैकी विविध व्यासाच्या गुरुत्ववाहिनीवरील गॅपची कामे पूर्ण करून शहरातील एकूण १३ जलकुंभ जुलै, २०२६ अखेर कार्यान्वित करण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियोजन असून यामध्ये सातारा-देवळाई परिसरातील एक जलकुंभाचा देखील समावेश आहे.

तसेच, जलशुद्धीकरण केंद्राचे २०० द.ल.लि. क्षमतेसाठी कामे तांत्रिक दृष्ट्या पूर्ण झालेली असून शहरास २०० द.ल.लि. पाणीपुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

-----------------

## भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणी संग्रहालयातील पशु-पक्षांकरीता देवनार येथील कत्तलखान्यातून मांस खरेदी करण्याबाबत

**(३७) * ९४७९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणी संग्रहालयातील पशु-पक्षांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आहार, देखभाल, सोयी-सुविधा पुरविल्या जात असून त्याकरीता कोट्यवधी रुपयाचे कंत्राट काढण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोट्यवधी रुपयांचे कंत्राट मंजूर होऊनही येथील प्राण्यांना मुबलक प्रमाणात अन्न पुरविले जात नाही तसेच प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना निकृष्ट दर्जाचे मांस खाण्यास दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मांसाहारी प्राण्यांना देण्यात येणाऱ्या मासांची तपासणी करण्याबाबत तसेच वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणी संग्रहालयाकरीता देवनार कत्तलखान्यातून सकस व निरोगी मांस खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणी संग्रहालयातील सर्व वन्यप्राणी-पक्ष्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार व विहित खाद्य तक्त्यानुसार खाद्य आहार मुबलक प्रमाणात दिला जातो.

कंत्राददाराने असमाधानकारक किंवा निकृष्ट दर्जाचा माल पुरवठा केल्यास सदर पुरवठा नाकारला जातो आणि अशा खराब दर्जाच्या मालाच्या पुरवठ्याकरीता संबंधित कंत्रादारास आर्थिक दंड आकारला जातो.

(३) वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणी संग्रहालयातील वन्यप्राणी-पक्ष्यांसाठी वर्षानुवर्षे देवनार कत्तलखान्यातून खरेदी केलेले मांस नियत कंत्राटदारांकडून प्राणिसंग्रहालयामध्ये पुरवठा केले जाते.

सदर पुरवठा केलेल्या आहाराची / मांसाची नियमित तपासणी देवनार येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तसेच पुरवठ्यानंतर प्राणिसंग्रहालयातील पशुवैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत तपासणी केली जाते. या मांसाचा दर्जा उत्तम असल्याची खात्री केल्यानंतरच मांसाचे वाटप प्राणिसंग्रहालयातील वन्यप्राणी पक्ष्यांना केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दूध भेसळ रोखण्यासाठी प्रभावी कायदा तयार करण्याबाबत

**(३८)** * **८६४७ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नामांकित दूध कंपन्यांच्या दुधात भेसळ होत असल्याच्या घटना वारंवार निदर्शनास येत असून त्यास आळा घालण्यासाठी आंध्र प्रदेशच्या धर्तीवर राज्यात कायदा तयार करण्यात येणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुधाच्या भेसळीचे प्रकार सातत्याने घडत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या टोळ्यांवर कडक कारवाई व्हावी अशी मागणी वारंवार केली जात असून, माहे जानेवारी, २०२६ मध्ये मुंबई आणि अहिल्यानगर येथे दूध भेसळीचे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दूध भेसळी संदर्भातील सर्वकष बाबींचा अभ्यास करुन याबाबतचा कायदा तयार करण्यात येणार असून प्रस्तावित कायद्यात दूध भेसळ हा अजामीनपात्र गुन्हा ठरविण्यात येणार असून त्यात दंड आणि तुरूंगवासाचीही तरतूद करण्यात आली आहे तसेच भेसळ पकडल्यानंतर कारवाई करण्यासाठी अन्न

व औषध प्रशासनासोबतच पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागालाही अधिकार देण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कायद्याचा मसुदा अंतिम करण्यात आला आहे काय, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदरहू कायद्यास मूर्त स्वरूप देऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणाऱ्या भेसळीला आळा घालण्यासाठीचा महाराष्ट्र राज्यासाठी दुधभेसळ अधिनियम तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

अन्न व औषध प्रशासन, बृहन्मुंबई कार्यालयाने दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी वर्सोवा पोलीस ठाण्याच्या पथकासह अंधेरी (प.), मुंबई येथील ७ ठिकाणी छापा टाकला असता अमूल व गोकुळ या नामांकित ब्रँन्डचे लेबल असलेल्या दूध पिशव्या टँपरिंग करून त्यातील दूध काढून त्यात पाण्याची भेसळ करून सदर दूधाच्या पिशव्या मेणबत्तीच्या ज्योतीच्या सहायाने पुन्हा पॅक करीत असल्याचे आढळले. सदर प्रकरणी वर्सोवा पोलीस ठाण्यात FIR क्र.११०५/२०२५ नोंद करण्यात आला असून ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २७४, ३४५, ३४७(१), ३(५) तसेच, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील कलम २६, २७, ३१, ५९ व ६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त असून अन्न विश्लेषक यांनी सर्व नमुने “कमी दर्जाचे (Sub-standard)” असल्याचे घोषित केले आहे. विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व अहवाल पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी वर्सोवा पोलीस ठाण्यास सुपूर्द करण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासन, अहिल्यानगर कार्यालयाने स्थानिक गुन्हे शाखेच्या सहकार्याने श्री.रामदास नवनाथ उबाळे यांचे घरालगत मु. पो फक्राबाद, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर येथे दुध भेसळी संदर्भात कार्यवाही करण्यात आली आहे. सदर ठिकाणी दुध भेसळी करीता वापरात येणारे द्रावण (White Liquid-Made from Paraffine and unkown Chemicals) चे पुरवठादार इसम १. समीर कमरुददीन शेख, व २. अफताफ कलीम शेख, हे वाहन क्र. एम.एच.१७ के ७९४६ मधुन दुध भेसळीकरीता सदर द्रावणाचा पुरवठा श्री.रामदास नवनाथ उबाळे यांना करत असताना पकडण्यात आले आहे. सदर प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशन ता.राहुरी, जि.अहिल्यानगर येथे १. समीर मरुददीन शेख, २. अफताफ कलीम शेख व ३. श्री.रामदास नवनाथ उबाळे यांचे विरुध्द अन्न सुरक्षा व मानके कायदा २६(१), २६(२)(i) शिक्षा कलम ५७ व ५९ तसेच, भारतीय न्याय संहिता कलम २७४, २७५, १२३, ३(५) अंतर्गत प्रथम खबरी अहवाल क्र. ८४/२०२६ दिनांक १४/०२/२०२६ रोजी नोंदवण्यात आला आहे.

अन्न विश्लेषक यांचे अहवालाप्रमाणे गायीचे दुधामध्ये Milk Fat ४.०० %, Milk Solid Not Fat ९.०० % तर इतर भेसळीबाबत दुग्ध परीक्षा नकारात्मक आढळुन आले आहेत व तसेच, अन्न विश्लेषक यांच्या अहवालामध्ये सदर दुधाची वाढीव गुणवत्ता कशामुळे आली याबाबत कोणताही स्पष्ट अभिप्राय नाही त्यामुळे सदर विश्लेषण अहवाल विरुध्द रेफेरल प्रयोगशाळेमध्ये अपील करण्यात आले आहे.

(३) व (४) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्यासाठी दूध भेसळ अधिनियम तयार करण्याची कार्यवाही सुरू असून त्यामध्ये भेसळीच्या गंभीरतेनुसार सहा महिन्यांपासून ते आजीवन कारावास आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतुद प्रस्तावित येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध महामार्गांच्या बांधकामासाठी तसेच रुंदीकरणासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केल्याबाबत

**(३९) * ८७७६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हिंदूहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग नागपूर-मुंबई, पुणे-मुंबई, कोल्हापूर-पुणे, पुणे-नाशिक, मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाची उभारणी होत असताना सुमारे १८ हजार ४५९ किलोमीटर लांबीचे १६ राष्ट्रीय महामार्ग आणि ३३ हजार ७०५ किलोमीटर लांबीचे ३६६ राज्य महामार्ग यांच्या रुंदीकरणात गत १२ वर्षांत सुमारे ७ लाख वृक्षांचा संहार होऊन अनेक महामार्ग उजाड झाले असून पर्यावरणाचे मोठे नुकसान झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरित महामार्ग धोरणानुसार प्रति किलोमीटर सजावटीची ६६६ आणि सावलीची १६८ अशी एकूण ८३४ झाडांची लागवड करुन ती जगविणे महामार्ग कंत्राटदाराला बंधनकारक असतानाही या धोरणाचे उल्लंघन झाल्याने या भागातील पर्यावरणाची हानी होऊन येथील जैवविविधता नष्ट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गांच्या दुतर्फा असलेली जुनी, डेरेदार झाडे तोडल्यामुळे महामार्ग परिसरातील तापमानात प्रचंड वाढ होऊन प्रवाशांना व स्थानिकांना उष्माघाताचा त्रास सहन करावा लागत असून वृक्षांतोडीच्या बदल्यात नवीन झाडे लावण्याचे नियम असूनही अनेकदा त्यांची अंमलबजावणी होत नसल्याने विकासकामे करताना पर्यावरण आणि रस्ते रुंदीकरण यांचा समतोल राखला जात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने महामार्गावरील झाडे लागवडीचा आढावा घेऊन याप्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई केली आहे तसेच उक्त भागात पुन्हा वृक्ष लागवड करण्यात आली आहे काय अद्याप वृक्ष लागवड करण्यात आली नसल्यास संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(५) असल्यास, वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होऊन जैवविविधता नष्ट झाली असून, सदर हानी भरून काढण्यासाठी व महामार्ग परिसर पुन्हा हरित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याशी समन्वय साधून शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अंशत:खरे आहे.

राज्यात विविध रस्ते जसे द्रुतगती महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांच्या बांधकामासाठी/रुंदीकरणासाठी गेल्या १२ वर्षात एकूण ५,३०,५९४ इतकी झाडे क्षतीग्रस्त झाली होती. तथापि, महामार्गाच्या दुतर्फा, कंत्राटदारांमार्फत/ शासकीय विभागांमार्फत लागवड करण्यात आलेल्या झाडांची संख्या ५१,१०,६३१ इतकी आहे.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग धोरणानुसार राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा झाडांची लागवड कंत्राटदारांमार्फत करण्यात येते. तथापि, बांधकाम सुरु असलेल्या रस्त्यांच्या झाडांची दुतर्फा लागवड ही बांधकामाच्या अंतिम टप्प्यात करण्यात येते.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग (नागपूर-मुंबई) या ७०१.३७९ कि.मी. लांबीच्या द्रुतगती मार्ग प्रकल्पांतर्गत महामार्गाच्या मध्यभागी राष्ट्रीय हरित महामार्ग धोरणानुसार प्रति कि.मी. २,००० सजावटीची व सावलीची रस्त्याच्या दुतर्फा प्रति कि.मी. १,६६६ वृक्षांची लागवड करण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने या प्रकल्पांतर्गत रस्त्याच्या एकूण लांबीत २२,०५,७५९ वृक्षांची लागवड पूर्ण करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

तोडलेल्या वृक्षांच्या बदल्यात नवीन झाडे लावण्यात आली असून काही ठिकाणी सदर वृक्ष लागवड प्रगतीत आहे.

(४) ज्या ज्या ठिकाणी रस्त्याचे बांधकाम प्रगतीत आहे व अंतिम टप्यात आलेले नाही अशा ठिकाणी रस्ता बांधकाम अंतिम टप्यात आल्यावर वृक्षारोपण करण्यात येते. ही निरंतर बाब असल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण यांनी एकत्रितपणे महामार्ग परिसर हरित करण्यासाठी ५१,१०,६३१ इतकी नवीन झाडे रस्त्यालगत लावली आहेत. तसेच सन २०२६-२७ मध्येही रस्त्याच्या बाजूला झाडे लावण्याचे काम नियोजनबध्दरित्या हाती घेतले आहे व हे काम पर्जन्यमान, पाणी उपलब्धता, रस्त्याच्या बांधकामाची स्थिती इत्यादी परिस्थिती पाहून त्याप्रमाणे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्व्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरात बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र आणि भोगवटा प्रमाणपत्र न घेता मालमत्तांचा ताबा घेतल्याबाबत

**(४०) * ८७२६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील नाशिक रोड, पंचवटी, सिडको आणि सातपूर या भागात जवळपास ४५ हजार ७०० अनधिकृत निवासी मालमत्तांचे पूर्णत्वाचे व भोगवटा प्रमाणपत्र नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये

वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत निवासी मालमत्तांचे पूर्णत्वाचे आणि भोगवटा प्रमाणपत्र नसतानाही रहिवाशांनी मालमत्तेचा ताबा घेतला असून उक्त अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिका कोणतीही कारवाई करित नसल्याने अनधिकृत बांधकामे, शहरी नियोजनातील त्रुटी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून शासनाने सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या अभिलेखावरील एकूण ६,०२,३७१ मिळकतींपैकी ५,२५,९५३ मिळकती अधिकृत आहेत. तसेच २८,४०३ खुल्या जागा आणि १,६२६ महानगरपालिकेच्या स्वतःच्या मिळकती आहेत. सद्य:स्थितीत एकूण ४६,३८९ मिळकती अनधिकृत असून, त्यावर अवैध भोगवटा विचारात घेऊन मालमत्ता कर दंडात्मक पध्दतीने लागू करण्यात आला आहे.

(२) आणि (३) ज्या मिळकतींचा वापर बांधकाम पूर्णत्वाचे व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करता (अवैध भोगवटा) सुरू असल्याचे आढळल्यास, त्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ (अ) तसेच, नगरविकास विभाग शासन निर्णय, दिनांक ११ जानेवारी २०१७ व पत्र दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ मधील निर्देशानुसार अवैध भोगवटा शास्ती लागू करून मालमत्ता कर आकारणीची कार्यवाही करण्यात येते. यानुसार नाशिक महानगरपालिकेने आदेश क्र. २३३ दिनांक ०८/०२/२०१९ अन्वये अंमलबजावणी सुरू केली असून, सद्य:स्थितीला अशा एकूण ४६,३८९ अवैध भोगवटा असलेल्या मालमत्तांना दंडात्मक पध्दतीने मालमत्ता कर लागू करण्यात आलेला आहे. याव्यतिरिक्त, भोगवटा प्रमाणपत्र घेण्यापूर्वीच इमारतीचा वापर सुरू केल्याचे निदर्शनास आल्यास, नाशिक महानगरपालिका नगरनियोजन विभागाच्या कार्यालयीन आदेश दिनांक १५/०६/२०१० अन्वये विनापरवानगी वापराबाबत दंडात्मक कारवाई म्हणून तडजोड फी आकारण्यात येते. या नियमानुसार निवासी सदनिकांकरीता रुपये १,५००/-, निवासेत्तर (व्यावसायिक) वापराकरीता रुपये ३,०००/- आणि मोठ्या स्वरूपाच्या बांधकामांकरीता (उदा. मंगल कार्यालय, थिएटर, हॉस्पिटल इत्यादी) रुपये ३०,०००/- इतकी दंडात्मक रक्कम महानगरपालिकेच्या खजिन्यात भरून घेण्यात येते आणि त्यानंतरच पुढील भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कारवाई करण्यात येते.

-----------------

## राज्यातील शिधापत्रिकांविषयक कामे आपले सरकार सेवा केंद्रामार्फत सुरू करुन ई-पॉस यंत्रणा अद्ययावत करण्याबाबत

**(४१) * ८७७१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिधापत्रिकाधारकांच्या शिधापत्रिकेसंबंधित विविध सेवांसाठी अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत सद्य:स्थितीत ऑनलाईन कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येत असून ऑनलाईन कार्यपध्दतीमुळे नागरिकांची शिधापत्रिकेत नाव वाढविणे, नाव कमी करणे, नवीन शिधापत्रिका काढणे

इत्यादी कामांसाठी मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शिधापत्रिकाधारकांना ३ महिन्यांचे धान्य वितरीत करण्याच्या सुचना केंद्र शासनाने देऊनही ई-पॉस या प्रणालीमध्ये झालेल्या तांत्रिक समस्येमुळे तीन महिन्यांच्या धान्य वितरणाबाबत आवश्यक माहिती अद्यावत न झाल्याने धान्य वितरण बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिधापत्रिकेसंबंधित विविध सेवा "आपले सरकार सेवा केंद्र" मार्फत ऑनलाईन व विकेंद्रित करण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री, मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचेकडे माहे फेब्रवारी, २०२६ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिधापत्रिकासंबंधी कामे आपले सेवा केंद्रामार्फत सुरू करण्यासाठी तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागांतर्गत ई-पॉस यंत्रणा अद्ययावत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) राज्यातील नागरीकांना शिधापत्रिका संगणकीकृत करण्याकरीता, RCMS पोर्टल केंद्र शासनाच्या NIC मार्फत विकसीत करण्यात आले आहे. सदर पोर्टलद्वारे शिधापत्रिकाविषयक ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माहे एप्रिल, २०२६ मध्ये RCMS ला कोणताही तांत्रिक अडचणी निर्माण झाली नसून सदर पोर्टल सुरळीत सुरू होते. RCMS पोर्टल मध्ये तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास NIC यांचे प्रतिनिधी यांच्यासोबत संपर्क साधून सदर तांत्रिक अडचण दूर करण्यात येते.
(२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत माहे एप्रिल, मे व जून, २०२६ या तीन महिन्याचे अन्नधान्य एकत्रित वाटप माहे एप्रिल पासून करण्याच्या सूचना केंद्र शासनाद्वारे प्राप्त झाल्या. त्यानुसार माहे एप्रिल, मे व जून, २०२६ या तीन महिन्याचे अन्नधान्य एकत्रित वाटप ई-पॉस मशिनवर उपलब्ध करून देण्यात आले. सबब, लाभार्थ्यांना ई-पॉस मशिनद्वारे अन्नधान्याचे वितरण सुरळीत सुरू आहे.
(३) विभागातील शिधापत्रिकेसदर्भातील विविध सेवा (नाव समाविष्ट करणे, नाव वगळणे, नवीन शिधापत्रिका नोंदणी इ.) आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आली आहे.
(४) शिधापत्रिकासंदर्भातील विविध सेवा आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत ऑनलाईन उपलब्ध करून देण्यासाठी कार्यप्रणाली, आकारण्यात येणारे सेवा शुल्क इ. संदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत उपायुक्त (पुरवठा), पुणे यांना दिनांक २२/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील पारडी येथील दहनघाटाच्या जमिनीचे आरक्षण पुर्ववत करण्याबाबत

**(४२) * ९१४४ डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराच्या विकास आराखड्यात पारडी दहनघाटासाठी आरक्षित असलेल्या १७.५० एकर जागेपैकी १६ एकर जागेचे आरक्षण स्मार्ट सिटी प्रशासनाने परस्पर बदलल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पारडी परिसरातील अडीच लाख लोकसंख्येसाठी सध्याचा दहनघाट अत्यंत अपुरा पडत असून, अंत्यसंस्कारासाठी नागरिकांना ताटकळत उभे राहावे लागत असतानाही केवळ दीड एकर जागा दहनघाटासाठी ठेवून उर्वरित जमिनीचे आरक्षण निवासी करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्मार्ट सिटी प्रशासनाने अधिकारांचा गैरवापर करून नियमांचे उल्लंघन करुन सदर जमीन भूमाफियांना दिल्यामुळे सार्वजनिक हितासाठी असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या जमिनीचा गैरप्रकार झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर परिसरात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत असून पारडीचे दहनघाटावर अंत्यसंस्काराकरीता जागा अपूरी पडत असल्याने १७.५० एकर मूळ आरक्षित जमीन दहनघाट विस्तारीकरण करण्यासाठी शासन उपाययोजना करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण गैरप्रकाराची शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच दहनघाटाची आरक्षित जागा पूर्ववत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, भविष्यात आरक्षित जमिनींच्या वापराबाबत असे गैरप्रकार टाळण्यासाठी व आरक्षण बदलण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी धोरणात्मक सुधारणांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेनूसार मौजा-पारडी येथील खसरा क्र. ८३/१ पैकी, ८३/२ पैकी ३६ पैकीचा जागेमध्ये आरक्षण क्र. E-६- दफन भूमी करीता क्षेत्र ७.१००८ हे.आर. आरक्षण प्रस्तावित होते. सदर ठिकाणी केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी प्रकल्पातंर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पूर्ण करून प्राथमिक नगर रचना परियोजना तयार करून शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आली. तद्नंतर शासनाने सदर प्राथमिक नगर रचना परियोजना दिनांक २१/१०/२०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूर करण्यात आली व सदरची परियोजना दिनांक ०१/१२/२०२१ पासून अंमलात आली आहे. सदर परियोजना तयार करताना उक्त आरक्षणाचे परिसीमन बदलवून आरक्षणाचे क्षेत्रफळ तसेच स्थानमान बदलण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(२) नगररचना परियोजनेनुसार मूळ भूखंड क्षेत्राच्या ४० टक्के मर्यादेत मौजा पारडी खसरा क्रं. ८३/२ व ८४-८७ अंतर्गत सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या दहन घाटाच्या ठिकाणी वाढीव क्षेत्रासह Burial Ground (दफनभूमी) क्रं. २९७ (क्षेत्र ४२३७ चौ.मी.) हे आरक्षण दर्शविण्यात आले आहे. तसेच नव्याने Burial Ground (दफनभूमी) क्रं. २९२ (क्षेत्र ७३०० चौ.मी.) हे आरक्षण दर्शविण्यात आले आहे. नगर रचना परियोजनेंतर्गत सदर आरक्षणांखालील जागा खाजगी जमीन मालकांकडून विनामोबदला ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

Burial Ground (दफनभूमी) च्या उपरोक्त २ आरक्षणा व्यतिरिक्त नगर रचना परियोजनेमध्ये मौजा पुनापूर येथे Burial Ground (दफनभूमी) क्रं. ३६६/१ (क्षेत्र १६.९९१ चौ.मी.), ३६२ (क्षेत्र २३,०११ चौ.मी.) व मौजा भरतवाडा येथे Burial Ground (दफनभूमी) क्रं. ४२७ (क्षेत्र १३.२०६ चौ.मी.) असे एकूण ५ आरक्षणे दर्शविण्यात आली आहेत

(३) नाही.

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी प्रकल्पातंर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पूर्ण करून सदर जागेवर नगर रचना परियोजना मंजूर करण्यात आलेली आहे.

(४) मौजा पारडी खसरा क्रं. ८३/२ व ८४-८७ अंतर्गत सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या दहन घाटाच्या ठिकाणी वाढीव क्षेत्रासह Burial Ground (दफनभूमी) क्रं. २९७ (क्षेत्र ४२३७ चौ.मी.) हे आरक्षण तसेच नव्याने Burial Ground (दफनभूमी) क्रं. २९२ (क्षेत्र ७३०० चौ.मी.) हे आरक्षण दर्शविण्यात आले आहे.

Burial Ground (दफनभूमी) च्या उपरोक्त २ आरक्षणा व्यतिरिक्त नगर रचना परियोजनेमध्ये मौजा पुनापूर येथे Burial Ground (दफनभूमी) क्रं. ३६६/१ (क्षेत्र १६.९९१ चौ.मी.), ३६२ (क्षेत्र २३,०११ चौ.मी.) व मौजा भरतवाडा येथे Burial Ground (दफनभूमी) क्रं. ४२७ (क्षेत्र १३.२०६ चौ.मी.) असे एकूण ५ आरक्षणे दर्शविण्यात आली आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली व परभणी जिल्ह्याच्या सीमेवर पूर्णा नदीवर बांधलेला पूल जोडरस्ते नसल्याने कार्यान्वित केला नसल्याबाबत

**(४३) * ९६५० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली आणि परभणी जिल्ह्याच्या सीमेवर येलदरी धरणाजवळ पूर्णा नदीवर बांधलेला सुमारे ८४ ते ९५ कोटी रुपये एवढ्या रकमेचा अत्याधुनिक केबल स्टेड पूल (Cable-Stayed Bridge) जोडरस्ते (Approach Roads) नसल्यामुळे वापरात नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम सुरू करण्यापूर्वीच सदर पुलाला जोडरस्ते व त्याकरीता भूसंपादन करणे गरजेचे असतानाही याबाबत स्थानिक अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याने नागरिकांना जुन्या पुलावरून धोकादायक स्थितीत प्रवास करावा लागत असून, यापूर्वी या पुलावर अनेक अपघात झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येलदरी धरणाच्या समोरच असलेला हा पूल मराठवाडा व विदर्भाला जोडणारा महत्वाचा दुवा असल्याने सदर पूल अरुंद आणि कठडे नसल्यामुळे धोकादायक झाला असून या ठिकाणी अद्ययावत पूल उभारावा अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पुलाच्या बांधकामात प्रशासकीय दुर्लक्ष करणाऱ्या विभागाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चिती करुन दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्त्यावर अस्तित्वातील जूना पूल पाटबंधारे विभागाचा इन्स्पेक्शन ब्रीज असून पूलाची रचना हि रस्त्यास सरळ रेषेत नसल्याने सदर रस्त्यावर वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन अपघात झाल्याचे निर्दशनास आले आहे. पुलाच्या जोडरस्त्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता देऊन त्यासाठीचे भूसंपादन करण्यात येत असून भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

अस्तित्वातील पूल अरुंद असून सद्य:स्थिती पूलाचे पाईप रेलिंग काही लांबीत क्षतीग्रस्त झाले असल्याने स्थानिक नागरीकांनी पूलाची मागणी केली होती. त्यानुषंगाने नवीन पूलाचे काम पूर्ण करण्यात आले असून जोडरस्ते लवकरच पूर्ण करण्याचे नियोजीत आहे. दरम्यानच्या काळात नागरीकांना पुलावरून वाहतूक करता यावी याकरीता पाईप रेलिंग बसवून जुना पूल वाहतूकी योग्य करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र युवक कल्याण मंत्रालय व युवा आयोग स्थापन करण्याबाबत

**(४४)** * **९६३१ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जवळपास ५०% लोकसंख्या ही ४० वर्षांखालील असूनही, राज्यात अद्याप स्वतंत्र 'युवक कल्याण मंत्रालय' अस्तित्वात नसल्यामुळे युवकांच्या प्रश्नांऐवजी केवळ क्रीडा विभागाच्या अनुषंगानेच धोरणे आखली जात असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील युवकांच्या वाढत्या आकांक्षा आणि समस्यांकडे विशेष लक्ष देण्यासाठी स्वतंत्र युवक कल्याण मंत्रालय आणि 'राज्य युवा आयोग' स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधी, नाशिक पदवीधर मतदार संघ यांनी माहे एप्रिल, २०२६ मध्ये शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत युवक कल्याण विभागाचे कामकाज क्रीडा विभागाशी जोडलेले असल्यामुळे युवकांच्या शैक्षणिक व रोजगाराच्या प्रश्नांकडे आवश्यक तेवढ्या गांभीर्याने पाहिले जात नाही, तसेच मुद्रा व शैक्षणिक कर्जासाठी 'CIBIL' सारख्या जाचक अटींमुळे सामान्य कुटुंबातील तरुण शासकीय योजनांपासून वंचित राहत असून त्यांच्यात असंतोषाची भावन निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केवळ विविध प्रशिक्षणे न देता, प्रशिक्षणानंतर रोजगाराची ठोस साखळी निर्माण करणे आणि 'Employment Exchange' (रोजगार मार्गदर्शन केंद्र) पुन्हा प्रभावी करून शासन व उद्योग यांच्यातील समन्वय मजबूत करण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, युवा धोरणाला ११ वर्षे झाल्याने सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या कामकाजाची सद्य:स्थिती काय आहे,

(६) असल्यास, युवकांच्या समस्यांवर स्वतंत्रपणे काम करण्यासाठी स्वतंत्र युवक कल्याण मंत्रालय व युवा आयोग स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) व (२) राज्यात सध्या स्वतंत्र युवक कल्याण मंत्रालया अस्तिवात नाही. मा.लोकप्रतिनिधी, यांनी मा.मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांना अग्रेषित केलेल्या दिनांक ०७/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये स्वतंत्र "युवक कल्याण मंत्रालय" आणि "युवा आयोग" स्थापनेबाबतच्या प्रक्रियेला गती देण्याबाबत विनंती केली आहे.

(३) व (४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत केंद्र पुरस्कृत, राज्य पुरस्कृत व जिल्हा नियोजन समिती पुरस्कृत विविध कौशल्य विकास योजना राबविण्यात येतात. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियान (PMKUVA), अंतर्गत कौशल्य विकास कार्यक्रम इ. योजनांतर्गत उद्योगांच्या कुशल मनुष्यबळाच्या मागणीनुसार १५ ते ४५ वयोगटातील उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करण्यात येते. सदर विभागाच्या अधिनस्थ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय हे राज्यस्तरावरील सेवायोजन कामासाठी शिखर कार्यालय म्हणून कार्यरत आहे. या कार्यालयाच्या www.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर नोकरीइच्छुक (Job seekers) उमेदवारांची नोंदणी केली जाते. विकसित महाराष्ट्र - २०४७" दस्तऐवजातील कौशल्य विभागाच्या कृती आराखड्यात विविध कौशल्य विकास विषयक योजना व उपक्रमांचे एकसुत्रिकरण, रोजगार मार्गदर्शन केंद्राचे कामकाज अधिक प्रभावी करणे, उमेदवारांना रोजगार प्राप्त होणे व तो टिकवणे याचा मागोवा घेण्यासाठी यंत्रणा (post placement and retention outcomes tracking systems) इत्यादी मुद्द्यांचा समावेश असून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) व (६) राज्याचे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या दोन बैठका झाल्या असून बैठकीतील निर्देशानुसार ६ उप समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. सदर समित्यांचे कामकाज प्रगती पथावर आहे.

-----------------

## पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत कर्मचाऱ्यांसाठी अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४५) * ९३७६ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या अंशदायी वैद्यकीय योजनेत पॅनलवर असणाऱ्या रुग्णालयांनी सदर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांवर केलेल्या उपचाराची वैद्यकीय देयके अदा केली नसल्याने सदर रुग्णालये उक्त कर्मचाऱ्यांवर आरोग्य उपचार करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण करीत असून कर्मचाऱ्यांवर सदरची रुग्णालये योग्य ते उपचार करीत नसल्याने त्यांना खाजगी रुग्णालयाकडून उपचार करावा लागत असून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर परिवहन महामंडळाने गत २५ वर्षांपुर्वी सुरु केलेल्या योजनेनुसार कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन आणि महागाई भत्यावर दरमहा २ टक्के रक्कम कपात करुनही कर्मचाऱ्यांसाठी अंशदायी वैद्यकीय सहाय योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसून कर्मचाऱ्यांचा वेतनातून कपात केलेल्या

निधीचा महामंडळ गैरवापर करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेच्या पॅनलवरील रुग्णालयांना त्यांनी केलेल्या उपचाराची देयके वेळीच अदा करण्याबाबत तसेच कर्मचाऱ्यांचा निधीचा अपव्यय करणाऱ्या महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील कर्मचाऱ्यांना अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेतून कर्मचारी यांच्यावर वैद्यकीय उपचार पॅनेल वरील हॉस्पिटल यांच्याकडून करण्यात येत असून रूग्णालयांची देयके प्रलंबित आहेत.

तथापि, प्रलंबित हॉस्पिटलच्या बिलांची देयके, निधी उपलब्धतेनुसार, अदा करण्यात येत असून, महामंडळाकडील कर्मचारी यांनी पॅनेल हॉस्पिटल व्यतिरिक्त खाजगी हॉस्पिटल येथून उपचार घेत असल्याचे महामंडळाचे निदर्शनास आलेले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-सासवड रस्त्यावरील श्री.संत ज्ञानेश्वर पालखी मार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४६) * ८९२९ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-सासवड (जि.पुणे) रस्त्यावरील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या अपूर्णावस्थेतील कामांमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडून नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून, वाहतूक कोंडीची गंभीर समस्या निर्माण झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही दिवसांत या मार्गावर वारंवार अपघात होत असून, विशेषतः रस्त्याच्या मधोमध उभे असलेले विजेचे खांब रात्रीच्या वेळी धोकादायक ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मार्गावरील ड्रेनेज लाईनच्या अपूर्ण कामांमुळे रस्त्यावर खड्डे निर्माण होऊन अपघाताचा धोका वाढला असून, काम सुरू असलेल्या ठिकाणी कुठलीही स्पष्ट दिशादर्शक चिन्हे किंवा सिग्नल व्यवस्था उभारण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर काम वेळेत पूर्ण न होण्यामागील कारणे काय आहेत, हा पालखी मार्ग लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने निश्चित कालमर्यादा ठरवून संबंधित ठेकेदारांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाची एकूण लांबी २३४ कि.मी. असून सदर महामार्गाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणा मार्फत प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत या पालखी मार्गाच्या दिवेघाट ते हडपसर या लांबीतील काम प्रगतीपथावर असून उर्वरित लांबीतील काम अंतिम टप्प्यात आहे. दिवेघाट ते हडपसर या भागाच्या लांबीतील सुमारे ६३% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम एप्रिल २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

शहरातील वाढत्या रहदारीमुळे वाहतूक सुरळीततेच्या दृष्टीने महामार्गाचे रुंदीकरण करणे गरजेचे होते. त्यास अनुसरून सदर प्रकल्पामध्ये १६.३८ कि.मी. लांबीचा सेवा रस्ता प्रस्तावित असून सद्य:स्थितीत त्यापैकी १५.१२ कि.मी. सेवा रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.

प्रकल्पाचे काम प्रगतीत असल्याने बांधकाम क्षेत्रात धूळ नियंत्रणासाठी व वाहतूक व्यवस्थापनासाठी नियमितपणे आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

(२) व (३) रस्ता रुंदीकरणामुळे आवश्यकतेनुसार काही ठिकाणी विजेचे खांब स्थलांतरित करण्याचे काम प्रगतीत आहे. MSEDCL विभागाकडून ठराविक दिवशीच शटडाऊन दिला असल्याने त्यानुसार विजेचे खांब स्थलांतरित करण्याचे काम सुरू आहे.

काही ठिकाणी भूमिगत ड्रेनेज/ जल नि:सारण वाहिन्यांची कामे प्रगतीत असल्याने आवश्यकतेनुसार खोदकाम करण्यात आलेले आहे. तथापि, काम सुरू असलेल्या ठिकाणी वाहतुकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक परावर्तक फलक, बॅरीकेडिंग, दिशादर्शक व चेतावणी फलक उभारण्यात आलेले आहेत.

(४) प्रकल्पाच्या करारनाम्यानुसार सदर प्रकल्प एप्रिल २०२७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील ७०० चौरस फुटांपर्यंत च्या निवासी सदनिकांना मालमत्ता कर माफ करण्याबाबत

**(४७)** * **८६५६ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत ५०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी सदनिकांना मालमत्ता करातून सूट देण्यात आली असल्याने अनेक मध्यमवर्गीय कुटुंबियांना दिलासा मिळाला असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने ७०० चौरस फुटांपर्यंतच्या (carpet area) निवासी सदनिकांना मालमत्ता कर (Property Tax) माफ करण्याचा निर्णय माहे मार्च, २०२६ मध्ये घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे मुंबईतील हजारो मध्यमवर्गीय कुटुंबांना विशेषतः पुनर्विकास झालेल्या चाळी आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार असून सदर ठराव महानगरपालिकेत मंजूर झाला असला तरी अधिकृत अंमलबजावणीसाठी शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील रहिवाशांनी वाढत्या महागाईमुळे तसेच मालमत्ता कराच्या आर्थिक भारामुळे शहराबाहेर न जाण्यासाठी उक्त ठरावाला तातडीने मंजुरी देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील ५०० चौ.फू. पर्यंतच्या निवासी सदनिकांना दिनांक १ जानेवारी, २०२२ च्या प्रभाव्य दिनांकापासून मालमत्ता करातून सूट देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मालमत्ता करासंदर्भात अधिकृत अंमलबजावणीसाठी ठराव सादर केला नसून सदरचा ठराव केवळ बृहन्मुंबई महापालिकेने त्यांचे मत व्यक्त करुन शासनाकडे निवेदन सादर केले आहे. त्याबाबत शासन स्तरावर वैधानिक व आवश्यक पडताळणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गतचे लाभार्थी मानधनापासून वंचित असल्याबाबत

**(४८) * ८८२३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत हजारो वयोवृध्द, विधवा व निराधार लाभार्थ्यांना गत ८ ते ९ महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांचे आधार कार्ड अदयावत नसणे किंवा बँक खात्याशी आधार लिंक नसणे अशा तांत्रिक कारणांमुळे ‘थेट लाभ हस्तांतरण’ प्रक्रियेत अडथळा निर्माण झाल्यामुळे मानधन प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने माहिती घेवून व तांत्रिक प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन या सर्वसामान्यांचे प्रलंबित मानधन त्यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) कोल्हापूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत आहे, तसेच लाभार्थ्याचे आधार बँक खात्याशी लिंक आहे अशा सर्व लाभार्थ्यांना माहे मे, २०२६ पर्यंतचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे.

तसेच ज्या लाभार्थ्यांचे आधार कार्ड बँक खात्याशी लिंक नाही, अशा लाभार्थ्यांना ग्राम महसूल अधिकारी यांचे मार्फत नोटीसद्वारे कळविण्यात आले असून लाभार्थ्यांना आधार कार्ड अपडेट करुन आधार बँक खात्याशी लिंक करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहे.

(३) विशेष सहाय्य योजनेतील ज्या लाभार्थ्यांना आधार कारणास्तव अर्थसहाय्य मिळालेले नाही अशा लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करणेबाबत तसेच त्यांचे बँक खाते आधारशी संलग्न करण्याबाबत जिल्हा/तालुका/मंडळस्तरावर विशेष मोहिम राबविण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आहेत.

तसेच ज्या लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य विविध कारणांमुळे प्रलंबित आहे, अशा लाभार्थ्यांची माहिती जिल्हाधिकारी यांचेकडून मागविण्यात आली असून त्यांना प्रलंबित अर्थसहाय्य देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेची 'समान पाणीपुरवठा योजना' अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४९)** * **८८६८ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या 'समान पाणीपुरवठा योजनेस' ट्रॅफिक, रेल्वे, लष्कर आणि सिंचन विभागाच्या आवश्यक असणाऱ्या परवानग्या मिळाल्या नसल्याने उक्त योजना अपूर्णावस्थेत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन सर्वांना समान दाबाने पाणी मिळण्यासाठी व भविष्यातील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होण्याकरीता सदर योजना तयार करण्यात आली असून, पाण्याच्या टाक्या, नवीन जलवाहिन्या, स्मार्ट मीटर, पंपींग स्टेशन, गळती नियंत्रण यासारख्या उपाययोजना करण्यात येत आहेत, परंतु प्रशासकीय समन्वयाअभावी सदर प्रकल्प अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे सुमारे ८५ टक्के काम पूर्ण झाले असून १५५८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च होऊनही शासकीय विभागांच्या परवानग्या नसल्याने उर्वरित १५ टक्के काम पूर्ण करण्यासाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या 'समान पाणीपुरवठा योजनेकरीता आवश्यक परवानग्या मिळवून देण्याकरीता तसेच योजना लवकर पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पुणे शहरातील पायाभूत सुविधा व नागरीसेवा प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांची महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येते. यामध्ये महापालिकेचे व इतर शासकीय विभागाकडील प्रलंबित विषयाचा आढावा घेऊन तसेच शासकीय विभागांशी समन्वय साधून प्रकल्पीय कामासाठीच्या आवश्यक त्या प्रलंबित परवानगीबाबतची कामे मार्गी लावण्यात येतात. याबाबत दिनांक ५/२/२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये ट्राफिक पोलीस विभाग, पाटबंधारे विभाग, जिल्हाधिकारी कार्यालयकडील बहुतांश अडचणीचे निराकरण झालेले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पाचे उर्वरित सुमारे १५ टक्के कामे ही शासकीय परवानग्या बरोबर, इतर कारणामुळे उदा. रस्ता रुंदीतील बांधकामे, भूसंपादन, दाट रहदारीचे रस्ते, मीटर बसविण्यासाठी नागरिकांचा विरोध, झोपडपट्टीतील अरुंद रस्ते इ. कारणामुळे देखील कामे प्रलंबित असून याबाबत महानगरपालिकेमार्फत आवश्यक पाठपुरावा करुन कामे मार्गी लावण्यात येत आहे. यासाठी समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत भांडवली कामे व पुढील दहा वर्षासाठी देखभाल/दुरुस्ती करीता रुपये २४६७.८५ कोटी इतक्या रक्कमेच्या निविदा मागविण्यात आलेल्या असून आतापर्यंत रुपये १६५९.६१ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(४) शासकीय परवानगीसाठी आयुक्त स्तरावर बैठका घेऊन सदर कामे मार्गी लावण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा भात खरेदी केंद्रावर नाकारला जात असल्याबाबत

**(५०) * ९४५७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात भाताचा दर्जा आणि तांत्रिक अटींमुळे हजारो शेतकऱ्यांचा भात खरेदी केंद्रावर नाकारला जात असल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात असल्याची बाब दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाचा लांबलेला कालावधी, सततचा ओलावा आणि कापणीच्या वेळी झालेल्या अतिवृष्टीमुळे भात पिकाचे नुकसान झाले असून, अनेक शेतकऱ्यांचा भात निकषानुसार पात्र ठरला नसल्याने रायगड जिल्ह्यातील सुमारे २० हजार नोंदणीकृत शेतकरी किमान आधारभूत किंमत योजनेपासून वंचित राहिले असून त्यांचा भात खरेदीविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी भात खरेदी प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करुन अतिरिक्त खरेदी केंद्र सुरु करुन पिकाच्या ओलावा निकषामध्ये सवलत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) व (२) रायगड जिल्ह्यातील २० हजार नोंदणीकृत शेतकरी किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेपासून वंचित असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये रायगड जिल्ह्यात जिल्हा पणन अधिकारी यांच्याकडे किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत एकूण ३९,५७२ शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. त्यापैकी २७,७५० शेतकऱ्यांकडून दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर एकूण ६,०२,०१० क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.

(३) केंद्र शासनाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचना व निर्देशाप्रमाणे राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत केवळ F.A.Q. (Fair Average Quality) दर्जाच्या धानाची खरेदी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये निकृष्ट दर्जाच्या आहाराचे वाटप होत असल्याबाबत

**(५१) * ९५६६ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वांद्रे (पूर्व) येथील खेरनगर महानगरपालिका इंग्रजी माध्यम शाळा क्रमांक २ व शिवाजीनगर शाळा संकुलातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाची खिचडी दिली जात असून, खिचडी अत्यंत खराब आणि खाण्यायोग्य नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी ती खाण्यास नकार दिला असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकही उपलब्ध नाहीत तसेच शाळांमध्ये आवश्यक सोयीसुविधाही उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये निकृष्ट दर्जाचा आहार पुरवणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्वच शाळांमध्ये पुरेसा शिक्षकवृंद उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

संबंधित विभागाचे प्रशासकीय अधिकारी (शाळा) एच/पूर्व यांच्याकडून दिनांक २१ एप्रिल, २०२६ रोजी सदर आहार पुरवठा करणाऱ्या संस्थेच्या आहाराबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्यामुळे शाळेत पुरवठा करण्यात आलेल्या आहाराचा नमूना तपासणीसाठी शासन नियुक्त श्री एटीआर लॅबोरेटरीज सर्व्हिसेस ओपीसी प्रा.लि. या प्रयोगशाळेत दिनांक २१ एप्रिल, २०२६ रोजी पाठविला असता प्रयोगशाळेचा अहवाल समाधानकारक आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत महानगरपालिकेच्या सर्व माध्यमांच्या एकूण ९३७ शाळा असून सदर शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्येनुसार ६८१६ शिक्षक आवश्यक आहेत. सद्य:स्थितीत ५२८४ शिक्षक कार्यरत असून १५३२ रिक्त पदे आहेत. सदर रिक्त पदांवर शासनाकडे शालेय शिक्षण विभागाकडे अतिरिक्त झालेल्या ४६८ शिक्षकांची तात्पुरती कार्यव्यवस्था महानगरपालिकेच्या शाळेमध्ये करण्यात आली आहे. तसेच आवश्यकतेनुसार शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत तासिका तत्वावर तात्पुरते शिक्षकांची नियुक्ती करुन देण्याची तरतूद करुन देण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये Right to Education नुसार पाणी, स्वच्छतागृह, रॅम्प इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) संबंधित विभागाचे प्रशासकीय अधिकारी (शाळा) एच/पूर्व यांच्याकडून दिनांक २१ एप्रिल, २०२६ रोजी सदर आहार पुरवठा करणाऱ्या संस्थेच्या आहाराबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्यामुळे सदर संस्थेस दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजी रुपये १०,०००/- दंड आकारणी करुन सदर रक्कम शासनखाती जमा करण्यात आली आहे. तसेच सदर संस्थेच्या दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजीची ऑनलाईन उपस्थिती शाळेकडून भरण्यात आलेली नाही. परिणामी सदर संस्थेचे दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजीचे आहार पुरवठ्याचे देयक संस्थेस अदा करण्यात आलेले नाही. दिनांक १५ जून, २०२६ पासून चालू होत

असलेल्या शैक्षणिक वर्षात खेरनगर महानगरपालिका इंग्रजी माध्यम शाळा क्रमांक २ येथे प्रशांती महीला मंडळ संस्थेऐवजी उजाला महिला बचत गट या संस्थेकडून आहार पुरवठा करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी येथील सुभेदार रामजी आंबेडकर नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर नसलेल्या १५५ बोगस झोपडीधारकांची पात्रता रदद करणेबाबत

**(५२) * ८९४४ अ‍ॅड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी येथील सुभेदार रामजी आंबेडकर नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेत मुळचे ४९६ झोपडीधारक निश्चित करुन विकासकास इरादा पत्र देण्यात आलेले असताना झोपडीधारकांच्या संख्येत वाढ करुन ती ५२५ एवढी करण्यात आल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विकासकास ४९६ झोपडीधारकांना लाभ देय असल्याचे निर्देश दिले असूनही पुन्हा ४० झोपडीधारकांची बेकायदेशीरपणे वाढ करण्यात आली आहे तसेच शासनाने दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी नवीन सक्षम प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करुनही उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण, कुलाबा यांनी बेकायदेशीरपणे सदर सुभेदार रामजी आंबेडकर नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर नसलेल्या सुमारे १५५ बोगस झोपड्या समाविष्ट करुन त्या बोगस पुराव्यांच्या आधारे पात्र केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर १५५ झोपडीधारकांना या योजनेत सदनिका देण्यात आल्या असून यात १०० कोटी रुपयांच्या रकमेचा गैरव्यवहार झाला असून विकासकास वाढीव एफएसआय मिळून सुमारे ३०० कोटी एवढ्या रकमेचा नियमबाह्यरित्या नफा होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन १५५ बोगस झोपडीधारकांची पात्रता तातडीने रदद करुन विकासकास देण्यात येणारा अवास्तव लाभ रदद करण्यासाठी तसेच सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वरळी येथील सुभेदार रामजी आंबेडकर नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे दिनांक १२/०८/१९९६ रोजी निर्गमित मूळ परिशिष्ट-२ हे ४६० झोपडीधारकांचे असून सदर योजनेस प्रथम आशयपत्र दिनांक ०६/०१/१९९८ रोजी देण्यात आले होते. तद्नंतर पारित करण्यात आलेल्या पुरवणी परिशिष्ट-२ नुसार झोपडीधारकांची संख्या ६३३ आहे.
(२), (३), व (४) शासनाने दिनांक १२/०८/२०२१ रोजी नवीन सक्षम प्राधिकारी यांच्या कार्यक्षेत्राबाबत राजपत्र प्रकाशित केले होते. तथापि, तत्कालीन सक्षम प्राधिकारी, कुलाबा यांनी त्यांच्या स्तरावर पूर्वीपासून कार्यवाही सुरु असलेल्या प्रकरणामध्ये निर्णय घेऊन दिनांक १३/०८/२०२१ रोजी पुरवणी परिशिष्ट-२ पारित केले होते. सदर पुरवणी परिशिष्ट-२ च्या अनुषंगाने तारखेबाबत फरक असल्याने व संबंधित झोपडीधारकांना पुनर्वसनाचा लाभ देण्याच्या अनुषंगाने तसेच झोपड्यांचे निष्कासन झाले असल्याने जागेवर पुनर्सर्वेक्षण करणे शक्य नसल्याने सदर पुरवणी परिशिष्ट-२ ग्राह्य धरण्याबाबत प्राधिकरणाने प्रस्ताव सादर केला होता.त्यानुषंगाने विभागाने कोणत्याही व्यक्तिस सदर पुरवणी परिशिष्ट-२ मध्ये तारखेसह

झोपडीधारकांच्या पात्रतेबाबत काही वाद अथवा संदिग्धता असल्यास अपिलीय प्राधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर व आवश्यकतेनुसार तक्रार निवारण समिती यांचे स्तरावर अपिल दाखल करण्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पू.) अधिनियम, १९७१ च्या तरतूदी नूसार करता येऊ शकेल. जर परिशिष्ट-२ मधील रहिवाश्यांपैकी कोणीही अपात्र आढळला तर प्रचलित धोरणानुसार पीएपीसाठी सदर सदनिकेचा वापर केला जाईल, असे कळविण्यात आले आहे. सदरील झोपडीधारकांपैकी ६१ झोपडीधारकांबाबत सक्षम प्राधिकारी-१ यांनी तपासणी करुन पात्र असे कळविले असून उर्वरित १०५ झोपडीधारकांच्या पात्रतेच्या पुर्नचौकशीची कार्यवाही सुरु आहे. सदर योजनेमध्ये अद्याप सदनिका वाटप करण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर-शिर्डी महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(५३) * ९३१३ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग १६० (NH-१६०) अंतर्गत सिन्नर-शिर्डी महामार्गावर अनेक ठिकाणी दुरुस्तीची कामे सुरु असून गावांजवळील पुलांच्या अपूर्ण बांधकामामुळे तसेच सातत्याने रस्त्यांच्या होणाऱ्या दुरवस्थेमुळे प्रवाशांना अपघातांचा धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिन्नर-शिर्डी महामार्गावर रस्त्याच्या आणि पुलाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे वाहतूक पूर्णपणे सुरू होण्यापूर्वीच डांबरी रस्त्याला तडे गेले असून सिन्नर बायपाससह काही ठिकाणी रस्त्याचे काम अद्याप प्रलंबित असल्याने वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे, काय,
(३) असल्यास, सदर महामार्गावर गतिरोधक, दिशादर्शक फलक आणि योग्य प्रकाश व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी अपघातांचे प्रमाण वाढले असून, रस्त्याची व पुलांची कामे अपूर्ण असतानाही टोल वसुली सुरु ठेवण्याची कारणे काय आहेत तसेच पुलांची कामे पूर्ण होईपर्यंत टोल वसुलीस स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, रस्त्याचे व पुलाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदार आणि संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच सातत्याने होणारे अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने सदर राष्ट्रीय महामार्गाची तात्काळ दुरुस्ती पूर्ण करुन प्रवाशांच्या सुरक्षेसाठी योग्य उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० अंतर्गत सिन्नर - शिर्डी या महामार्गाच्या ५०.९४३ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणांमार्फत ऑगस्ट २०२० मध्ये हाती घेण्यात आले होते. मार्च २०२३ मध्ये या ५०.९४ कि.मी पैकी ४७.७५ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले. उर्वरित ३.१९ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम भूसंपादनाअभावी पूर्ण होऊ शकले नाही.

उर्वरित लांबीतील काम पूर्ण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणांमार्फत जानेवारी २०२५ मध्ये नव्याने EPC तत्वावर काम हाती घेण्यात आले आहे. उर्वरित कामांमध्ये प्रामुख्याने मौजे पांघरी, मौजे चांदे कसारे व मौजे सावळी विहीर येथील उड्डाणपूलांचा समावेश आहे. प्रगतीतील कामांच्या ठिकाणी वळण रस्ते सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहेत. महामार्गाचे उर्वरित काम जुलै २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) सद्य:स्थितीत उड्डाणपूलाची कामे प्रगतीपथावर असून वाहतूक सेवा रस्त्यांवरून वळविण्यात आली असल्याने काही ठिकाणी वाहतूक कोंडी होते. महामार्गाच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची चाचणी तसेच महामार्गाच्या कामाची गुणवत्ता वेळोवेळी प्रकल्प सल्लागार यांच्यामार्फत तपासण्यात आली असून महामार्गावर निकृष्ट दर्जाचे काम आढळून आलेले नाही. सिन्नर बायपासचे काम पूर्ण झाले असून बायपासचे काम सुस्थितीत आहे.

(३) महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी IRC मानकाप्रमाणे दिशादर्शक फलक, माहिती फलक, ट्रॅफिक ब्लिंकर्स व इतर सुरक्षा तरतुदी करण्यात आलेल्या आहेत तसेच Flood lights व High Mast ही लावण्यात आलेले आहेत.

प्रचलित कार्यपध्दतीनुसार सद्य:स्थितीत टोल वसुली पूर्ण करण्यात आलेल्या ४७.७५ कि.मी या लांबीसाठी करण्यात येत असून प्रगतीत असलेली लांबी वगळण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथे प्रस्तावित क्रीडा विद्यापीठाची उभारणी करण्याबाबत

**(५४)** * **८७३७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथे क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याकरीता शासनाने मौजे करोडी शिवारातील गायरान गट नं.१३५ मधील ५५ हेक्टर ७९ आर क्षेत्रफळापैकी प्रस्तावित क्रीडा विद्यापीठासाठी ४६ हेक्टर ६० आर एवढी अधिकृत जमीन दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राखीव भुखंडावर अद्याप क्रीडा विद्यापीठाचे कामकाज सुरु न झाल्याने अनेक भुमाफियांकडून गौण खनिजाचे उत्खनन सुरु असून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गौण खनिज उत्खननाबाबत महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे सदर जमिनीवर खदानी/विहिरीप्रमाणे खोलवर खडडे पडल्याने भविष्यात क्रीडा विद्यापीठाचे कामकाज सुरु करताना सपाटीकरण व खडडे भरण्यासाठी शासनास कोटयवधी रुपये खर्च करावे लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गौण खनिज उपसा थांबविण्याकरीता तसेच क्रीडा विद्यापीठाची उभारणी लवकर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मौजे करोडी, ता.छत्रपती संभाजीनगर येथील गट क्र.१३५ मधील ४६ हेक्टर ६० आर (११५ एकर) जमीन देण्यात आलेली आहे, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर भूखंडावरील मुरुम, गौणखनिजाचे अवैध उत्खनन झाले असल्याचे निदर्शनास आल्याने दौलताबाद पोलीस स्टेशन येथे मंडळ अधिकारी, करोडी यांनी ००७८/२०२३ अन्वये दिनांक २४/०५/२०२३ रोजी संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

शासन निर्णय दिनांक ०२/११/२०२३ अन्वये क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यासाठी अधिनियम करण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील वाडिया रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टरांच्या उपचारातील हलगर्जीपणामुळे ४ महिन्यांच्या बाळाचा मृत्यू झाल्याबाबत

**(५५) * ८७७९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वाडिया रुग्णालयातील (मुंबई) व्हेंटिलेटरमध्ये तांत्रिक बिघाड होऊन ऑक्सिजन पुरवठा खंडित झाल्यामुळे चार महिन्यांच्या बाळाचा मृत्यू झाला असून बाळावर वरिष्ठ डॉक्टरांऐवजी प्रशिक्षणार्थी डॉक्टर व नर्सकडून उपचार करण्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाळाच्या मृत्यूप्रकरणी बाळाच्या आईने संबंधितांविरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन प्रशिक्षणार्थी डॉक्टरास उपचार करण्यास मुभा देण्याऱ्या तसेच संबंधित दोषी डॉक्टर व रुग्णालय प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) यासंदर्भात चौकशी करण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांनी दिनांक १९ मे, २०२६ रोजीच्या आदेशान्वये समिती गठीत केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमास इलेक्ट्रीक डबलडेकर बसेसचा मे. स्वीच ई-मोबिलिटी कंपनीकडून पुरवठा करण्यात आला नसल्याबाबत

**(५६) * ८८४९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाने (बेस्ट) सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात एकूण १२०० इलेक्ट्रीक डबल डेकर तसेच २०० एसी डबल डेकर बसची ऑर्डर देऊनही फक्त ५० बसगाड्या उपक्रमाला प्राप्त झाल्या असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डबल डेकर बसची गरज नसल्याचे स्पष्ट करत ७०० डबल डेकर बसची निविदा रद्द केली आणि २०० एसी डबल डेकर बसचे कंत्राटच कायम ठेवले, परंतु दीड वर्ष होऊनही या बसची संख्या वाढलेली नसल्यामुळे कंपनीला वारंवार मुदत देण्यात येऊनही नोटीसही बजाविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेस्टने २०० एसी डबल डेकर बससाठी मे. स्वीच ई. मोबिलिटी कंपनीसोबत करार केला असून बसच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या सुट्या भागांच्या किंमती वाढल्याने गाड्यांचा पुरवठा झालेला नसून उर्वरित डबल डेकर बसेस पुरविण्याबाबत बेस्टच्यावतीने नोटीस देऊनही स्वीच मोबॅलिटी या कंपनीकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीकडून बसेसचा पुरवठा न झाल्यामुळे उक्त कंपनीस काळया यादीत टाकून दंडात्मक कारवाई करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच बेस्टला उर्वरित बसेसचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाने (बेस्ट) ९०० इलेक्ट्रिक डबल डेकर बसेसच्या खरेदीसाठी २ निविदाकारास दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी कार्यादेश दिले असून त्यापैकी ५० एसी इलेक्ट्रिक डबल डेकर बसेसचा दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजी पुरवठा झाला आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

२०० इलेक्ट्रिक डबल डेकर बसचे नियुक्त पुरवठादार मे. स्वीच ई-मोबिलिटी प्रा.लि. यांनी ५० बसेसचा पुरवठा केला आहे. तथापि, सुट्या भागाच्या किंमतीत वाढ झाल्याने उर्वरित १५० बसेससाठी दर वाढवून देण्याची त्यांनी मागणी केली आहे. दरम्यान पुरवठादारास मुदतवाढ देण्यात आलेली नाही. तसेच त्यांनी नियोजित वेळेत आवश्यकतेप्रमाणे पुरवठा केला नसल्याने त्यांना नोटीस देण्यात आल्या आहेत.

दुसरे कंत्राटदार मे. कॉसिस ई-मोबिलिटी प्रा.लि. यांनी ७०० इलेक्ट्रिक डबल डेकर बसेसपैकी एकही बसचा पुरवठा केला नसल्याने त्यांची निविदा रद्द करुन त्यांना काळया यादीत टाकण्याचे बेस्ट उपक्रमाकडून घोषित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील शासकीय धानाची भरडाई प्रक्रिया सुरळीत करुन गोदामांची क्षमता वाढविण्याबाबत

**(५७) * ९१५१ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात सन २०२५-२०२६ या वर्षात सुमारे ३२ लाख क्विंटल धानाची खरेदी झाली असून, मागील शिल्लक व रब्बी हंगामातील अंदाजित धान मिळून एकूण ५० लाख क्विंटल धानाची भरडाई प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खरेदी केलेले लाखो क्विंटल धान खरेदी केंद्रावर उघड्यावर पडून असून शासकीय गोदामांच्या अपुऱ्या क्षमतेमुळे धानाची भरडाई होण्यास झालेल्या विलंबामुळे मोठ्या प्रमाणावर धान खराब होऊन शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भरडाई केलेला तांदूळ जमा करण्यासाठी शासकीय गोदामांची क्षमता कमी असल्याने तांदूळ स्वीकारण्यास विलंब होत असून, त्यामुळे राईस मिलसना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून या संपूर्ण प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गोंदिया जिल्ह्यातील शासकीय धानाची भरडाई प्रक्रिया सुरळीत करुन गोदामांची क्षमता वाढवून तांदूळ स्वीकारण्याची प्रक्रिया गतिशील करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली तसेच कस्टम मिलिंग प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) व (२) पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान भरडाईची दिनांक ३१ जुलै, २०२६ ही खरीपसाठी तर दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२६ रब्बीसाठी अंतिम मुदत आहे. गोंदिया जिल्ह्यात खरीप पणन हंगामामध्ये खरेदी झालेल्या ३३.६७ लाख क्विंटल धानापैकी २९.७० लाख क्विंटल धान दिनांक १५ जून, २०२६ अखेर भरडाईसाठी गिरणीधारकांना देण्यात आला आहे.

आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेल्या व उघड्यावर साठवणूक केलेल्या धानाची भरडाईसाठी १०० टक्के उचल करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रादेशिक समतोल राखण्यासाठी धान खरेदी, गिरण्यांची संख्या, Least cost basis तत्वावर जोडण्याची आवश्यकता, जिल्ह्यामधील मागील हंगामामध्ये गोदामांना जोडून देण्यात आलेल्या गिरण्यांची संख्या, शासनाच्या निधीची बचत, अनावश्यक क्षमतेचे गोदाम टाळणे, समन्यायाने पारदर्शकपणे सीएमआर साठवणूकीसाठी गोदामे भाड्याने घेण्यात आले आहेत. गोंदिया जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ८४,४०० मे. टन क्षमतेची ३० गोदामे भाड्याने घेण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने शाळांच्या इमारती धोकादायक असल्याच्या कारणास्तव ३५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना अन्य शाळांत स्थलांतरित केल्याबाबत

**(५८) * ९५८६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)बृहन्मुंबई महानगरपालिकेने गत तीन वर्षात शाळांच्या इमारती धोकादायक असल्याने सुमारे ३५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना अन्य शाळांत स्थलांतरित केले असून सदर धोकादायक इमारतींमध्ये न्यु माहीम स्कूल, कुलाबा व घाटकोपरमधील शाळांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी येथील समुद्रकिनाऱ्यासमोर असलेली शाळा धोकादायक घोषित करुन ६०० विद्यार्थ्यांना अन्य शाळेत स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांच्या इमारतींना धोकादायक घोषित करुन विद्यार्थ्यांचे स्थलांतरण करण्याच्या निर्णयाची मालिका सुरुच असून, मोक्याच्या ठिकाणी असलेल्या आणि उत्तम विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांच्या इमारती धोकादायक असल्याचे सांगून तेथील विद्यार्थ्यांना अन्य शाळांमध्ये स्थलांतरीत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थलांतरित विद्यार्थ्यांना अन्य शाळेत स्थलांतरित करताना शाळा व घर यातील अंतर अधिक असल्याने विद्यार्थी व पालकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, विद्यार्थ्यांना घरापासून जवळ असलेल्या शाळांमध्ये स्थलांतरित करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतींची शाळा पायाभूत सुविधा कक्षाकडून नियतकालिक तसेच शालेय प्रशासनाकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येते. सदर तपासणीतील निरिक्षणांच्या अनुषंगाने सदर शालेय इमारतींचे बृहन्मुंबईच्या नोंदणीकृत संरचनात्मक सल्लागारांमार्फत / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांमार्फत संरचनात्मक परिक्षण करण्यात येते. सल्लागारांकडून प्राप्त संरचनात्मक परिक्षण अहवालातील इमारतीच्या नमूद प्रवर्गानुसार घोषित झाल्यास त्या इमारतीतील विद्यार्थ्यांना त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जवळपासच्या इतर शालेय इमारतीत स्थलांतरीत करून सदर शालेय इमारत निष्कासित करण्यात येते.

(४) विद्यार्थ्यांना शाळेपासून घरापर्यंत मोफत बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी आणि वजन-मापात अचूकता राखण्यासाठी वैध मापन शास्त्र कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(५९) * ९५१४ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी आणि वजन-मापात अचूकता राखण्यासाठी वैधमापन शास्त्र (Legal Metrology) कायदा, २००९ अंतर्गत महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ ची अंमलबजावणी केली जात असली तरीही बाजारात कमी वजनाच्या वस्तू घालून त्यांची विक्री होत असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वजन-मापे तयार, दुरुस्त करणाऱ्या किंवा विकणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी वैध मापन शास्त्र विभागाचा परवाना अनिवार्य असून वजन-मापांचे वेळोवेळी प्रमाणीकरण (Verify/Stamp) करणे

बंधनकारक असताना देखील बाजारात एक लिटर खाद्यतेल आहे असे दाखवून ७५० मि. लि., ८०० मि.ली. च्या पिशव्या विकून मोठ्या प्रमाणात मापात फसवणूक होत असल्याने ग्राहकांना आर्थिक भुर्दंड बसत असतानाही अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून वेळीच दखल न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, राज्यातील ग्राहकांना दिलासा देण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून वैध मापन शास्त्र निरीक्षकांकडून बाजारात अचानक तपासणीव्दारे (Surprise Checks) दोषी व्यापाऱ्यांवर कारवाई करुन कमी वजनाची फसवणूक आढळल्यास जप्तीची कारवाई व दंडाची वसुली करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

कमी वजनाच्या आवेष्टित वस्तूंबाबत मार्च, २०२६ मध्ये तक्रारी प्राप्त नाहीत. तथापि, तत्पुर्वी अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

खाद्यतेलाच्या अनुषंगाने कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) खाद्यतेलाच्या अनुषंगाने यासंदर्भात तक्रारी प्राप्त न झाल्याने निरीक्षकांकडून बाजारात तपासणी करण्यात आलेली नाही.

तथापि, आवेष्ठित वस्तुच्या निर्धारीत मुल्यापेक्षा जास्त मुल्य घेणे, निर्धारीत वजन अथवा नग पेक्षा कमी किंवा त्यावरील घोषवाक्य याबाबतच्या उल्लंघनाबाबत वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्या अंतर्गत महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ व वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, २०११ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

एप्रिल, २०२५ ते मार्च, २०२६ या कालावधीत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित आस्थापनांच्या तपासण्या करण्यात येऊन उल्लंघन केल्याचे आढळून आलेल्या आस्थापनांविरूध्द खटले नोंदविण्यात आले व त्यापोटी संबंधित आस्थापनांकडून रुपये २,५६,७१,७००/- एवढया रकमेचे प्रशमन शुल्क (दंड) वसुल करण्यात आलेले आहे.

कमी वजनाची फसवणूक आढळल्यास वैध मापन शास्त्र यंत्रणेद्वारे ग्राहकांसाठी National Consumer Helpline, ईमेल, व्हॉट्सॲप या माध्यमातून तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली येथील समता नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या उच्च उत्पन्न गटाच्या सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत

**(६०) * ९१७७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाने समतानगर येथील ८ HIG (इमारती क्र. २३, २५, २७, २८, २९, ३१, ३२ व ३४) सोसायटींच्या इमारती व आसपासच्या क्षेत्रासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) मंजूर केला असून २००.७५ कोटी रुपये स्वीकारुन १५३८८६.५० चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्राची परवानगी दिली

असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ८ HIG संस्थांकडे स्वतंत्र नोंदणीकृत अभिहस्तांतरण पत्र (Conveyance Deed) व ९९ वर्षांची भाडेपट्टा करार (Lease Deed) असून म्हाडा सोबतच्या विक्री करारानुसार (Sale Deed) सर्व समतानगर संस्थांनी युनियन/फेडरेशनला फक्त देखभाल व सामान्य सेवा व्यवस्थापनासाठीचे अधिकार दिले असून संस्थांच्या AGM मध्ये संस्थेच्या पुनर्विकासाकरीता कोणत्याही पुनर्विकासक (Redeveloper) किंवा युनियनची नेमणूक केलेली नसतानाही व कोणत्याही करारनामाशिवाय परस्पर एस.डी. कॉर्पोरेशन प्रा.लि. ला पुनर्विकासाचे अधिकार दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासकास या ८ HIG संस्थांच्या पुनर्विकासाची दिलेली परवानगी रद्द करुन इमारतींचा पुनर्विकास संस्थेने निवडलेल्या विकासकाद्वारे करण्याबाबत तसेच वाढीव FSI या ८ HIG संस्थांकडेच देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) समतानगर सह. गृह. संस्था युनियनने दिनांक ०७/०१/२००७ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये विकासक मे. एस.डी. कॉर्पोरेशन प्रा. लि. यांना नियुक्त केले व त्यांचेसोबत दिनांक १९/०२/२००७ रोजी विकास करारनामा केला.

८ उच्च उत्पन्न गट (HIG) संस्थांपैकी ६ संस्था समता नगर सह.गृ.संस्था युनियनचे सभासद आहेत. समतानगर, कांदिवली (पूर्व) वसाहतीच्या एकत्रित पुनर्विकास करण्याबाबत शासनाने दिनांक ०६/११/२००७ रोजीच्या पत्रान्वये परवानगी दिलेली आहे. तसेच तत्का. मा.मंत्री (सहकार) यांच्या दिनांक १२/११/२०१३ रोजीच्या आदेशान्वये, दिनांक ०७/०१/२००७ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठराव सर्व सभासद संस्थांवर बंधनकारक असल्याबाबतचा भाग अहवालामध्ये समाविष्ट करण्यात आला असून ६३ संस्थांची मे.एस.डी.कॉर्पोरेशन यांच्या नेमणूकीस संमती असल्याची वस्तुस्थिती कायम करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विविध कामांसाठींच्या निविदा प्रक्रियांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(६१)** * **८८२१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अटल सेतूवरील फायबर ऑप्टीक केबल, बीकेसी-चुनाभट्टी कनेक्टर तसेच विक्रोळी येथील फूटओव्हर ब्रिज या प्रकल्पांच्या निविदांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे आणि एका विशिष्ट कंपनीला फायदा मिळवून देण्यासाठी अटींमध्ये बदल केल्याची बाब दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विक्रोळी येथील पादचारी पूल उभारणीसाठी सुमारे ९० कोटी रुपयांच्या कामाची निविदा आठ कंपन्यांनी भरली परंतु त्यातील सहा कंपन्यांना दबाव टाकून माघार घेण्यास भाग पाडले, उरलेल्या दोन

कंपन्यांपैकी एमएस स्पेको या कंपनीस काम देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, 'अटल सेतू' वरील फायबर ऑप्टीक केबल टाकण्याच्या निविदेला माहे फेब्रुवारी, २०२६ पासून कोणतेही ठोस कारण न देता ८ ते १० वेळा मुदतवाढ देण्यात आली असून, माहे जानेवारी, २०२६ पासून ज्या निविदांना तीनपेक्षा अधिक वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे आणि ज्या ठिकाणी इतर कंत्राटदारांना माघार घेण्यास भाग पाडले आहे अशा सर्व प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी शासनाकडे प्राप्त झाली आहे काय,
(४) असल्यास, निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने पारदर्शकपणे राबवावी तसेच माघार घेणाऱ्या कंपन्यांना काळ्या यादीत टाकून त्यांची सुरक्षा ठेव जप्त करावी अशी मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, निविदा प्रक्रियेतील सदर गैरव्यवहार रोखण्यासाठी पारदर्शकपणे निविदा किंवा फेरनिविदा काढण्याबाबत तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वरील सर्व कामांच्या निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे न राबविणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अटल सेतूवर फायबर ऑप्टीक केबल टाकणे, बीकेसी-चुनाभट्टी कनेक्टर व विक्रोळी येथील फूटओव्हर ब्रिज या प्रकल्पांसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तथापि, अटल सेतूवरील फायबर ऑप्टिक केबल, बीकेसी-चुनाभट्टी कनेक्टर तसेच विक्रोळी येथील फूटओव्हर ब्रिज प्रकल्पांच्या निविदांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे अथवा कोणत्याही विशिष्ट कंपनीस लाभ मिळावा यासाठी निविदेच्या अटींमध्ये बदल करण्यात आल्याचे आढळून आलेले नाही.
(२), (३), (४), (५) व (६) विक्रोळी पादचारी पूल (FoB) बाबत एकूण ८ निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा दस्तऐवजांनुसार आवश्यक असलेल्या अनिवार्य पात्रता प्रमाणपत्रांबाबत स्पष्टीकरण सादर करण्यासाठी दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ व ११ मार्च, २०२६ रोजी संबंधित निविदाकारांना ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते. तथापि, यापैकी संबंधित ४ निविदाकारांनी आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांना पात्रता निकष पूर्ण न केल्याच्या कारणास्तव अपात्र ठरविण्यात आले. उर्वरित पात्र ४ निविदाकारांपैकी दोन तांत्रिक दृष्टया पात्र निविदाकारांनी स्वेच्छेने व लेखी स्वरूपात माघार घेतल्याने केवळ २ निविदाकार आर्थिक मूल्यांकनासाठी पात्र ठरले. निविदा प्रक्रियेतून माघार घेतलेल्या संबंधित २ निविदाकांराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात आली आहे.

अटल सेतू (MTHL) OFC कामाबाबत: अटल सेतूवरील फायबर ऑप्टिक केबल (OFC) टाकण्याच्या निविदा प्रक्रियेमध्ये संभाव्य निविदाकारांच्या विनंतीनुसार निविदेस एकूण आठ (८) वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेमधून कोणत्याही निविदाकाराने माघार घेतलेली नाही.

अटल सेतू (MTHL) येथील OFC डक्ट स्पेस परवाना निविदेबाबत सामान्य सल्लागाराने (General Consultant) तांत्रिक, धोरणात्मक तसेच सुरक्षा विषयक बाबींचा विचार करून निविदा प्रक्रिया रद्द करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. या निर्णयामागे राष्ट्रीय धोरणाशी सुसंगतता राखणे, प्रकल्पाच्या व्याप्तीतील आवश्यक बदल, सुरक्षा निकषांची पूर्तता तसेच भविष्यातील विस्तारक्षमतेचा विचार करण्यात आला असून, सदर निर्णय पूर्णतः तांत्रिक, धोरणात्मक व सुरक्षा विषयक कारणांवर आधारित आहे.

बांद्रा-कुर्ला-संकुल-चुनाभट्टी कनेक्टर संदर्भातील निविदेसंदर्भातील कामाची निविदा प्रक्रिया अथवा अंमलबजावणी ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फंत करण्यात आलेली नाही.

प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व निविदा प्रक्रिया या केंद्रीय सतर्कता आयोग (CVC) यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच एमएमआरडीएच्या प्रचलित धोरणांनुसार राबविण्यात येतात.

-----------------

## पुणे शहरातील होर्डिंगजधारकांकडे कोट्यवधी रुपयांची थकबाकी असल्याबाबत

**(६२)** * **८९०० श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील अधिकृत होर्डिंगधारकांकडे सन २०१३ ते २०१८ या कालावधीतील कोट्यवधी रुपयांची थकबाकी असून शहरात अनधिकृत होर्डिंगजच्या आकडेवारीचे यापूर्वी सर्व्हेक्षण होऊनही अधिकृत आकडेवारी प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या परवाना आणि आकाशचिन्ह विभागांतर्गत येणाऱ्या जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) प्रलंबित वसुलीबाबत लेखापरीक्षण अहवालानुसार सुमारे ४०४ कोटी रुपयांहून अधिक रक्कम वसुलीपात्र असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर थकबाकी वसुल करण्याच्या दृष्टीने तसेच अनधिकृत होर्डिंग्जच्या आकडेवारीचे सर्व्हेक्षण करुन अनधिकृत होर्डिंग्ज लावणाऱ्या संस्था / व्यक्तींकडून वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागामार्फत वेळोवेळी सर्वेक्षण करण्यात येऊन सन २०२२-२०२३ मध्ये ९०५, सन २०२३-२०२४ मध्ये ६३४, सन २०२४-२०२५ मध्ये २२७ आणि सन २०२५-२०२६ मध्ये २०८ याप्रमाणे एकूण १९७४ अनधिकृत जाहिरात फलक शोधून त्या सर्व जाहिरात फलकांवर निष्कासन कारवाई करण्यात आली आहे. तसेच, १५ क्षेत्रिय कार्यालयामार्फत दैनंदिन स्वरुपात सर्वेक्षण करण्यात येऊन आढळून येणाऱ्या जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

पुणे मनपा, परवाना आणि आकाशचिन्ह विभागाची मान्यताप्राप्त जाहिरात फलक (होर्डिंग्ज) प्रलंबित वसुलीबाबत लेखापरीक्षण विभागाकडून ४०४ कोटी रुपयांहून अधिक रक्कम वसुलीपात्र असल्याचे कळविण्यात आले आहे.

तथापि, सदर वसुलीची रक्कम निश्चित करताना दर आकारणी संदर्भातील परिस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे. विशेषतः महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र.३३८. दिनांक २८/१२/२०२२ रोजी दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये विखंडित करण्यात आला आहे. यास्तव सदर कालावधीतील शुल्क आकारणीच्या दरांमध्ये तफावत निर्माण झालेली आहे. परिणामी विविध न्यायालयीन आदेश, लागू असलेले शुल्क तसेच प्रत्यक्ष वसुली यामध्ये फरक निर्माण झाल्यामुळे संपूर्ण रक्कम थेट थकबाकी म्हणून ग्राह्य धरणे वस्तुनिष्ठ ठरणार नाही.

(३) अनधिकृत जाहिरात फलक (होर्डिंग्ज) बाबत संबंधित परवानाधारक संस्था / व्यक्तींची प्रकरणनिहाय १५ क्षेत्रिय कार्यालयाकडून तपासणी करून थकीत शुल्काची निश्चिती करण्यात येत आहे. त्यानुसार थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी देयक निर्गमित करणे, पाठपुरावा करणे तसेच आवश्यकतेनुसार कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदरास जोडणाऱ्या हरित महामार्ग प्रकल्पामुळे हजारो झाडे तोडली जाणार असल्याबाबत

**(६३) * ८९७६ ॲड.अनिल परब, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढवण बंदराला जोडणाऱ्या प्रस्तावित ३२.१० किमी लांबीच्या 'ग्रीनफिल्ड' महामार्गामुळे (वाढवण ते तवा) २३७.०८ हेक्टर वन जमीन संपादित केली जाणार असल्यामुळे पालघर आणि डहाणू तालुक्यातील सुमारे ७२,७९० फळझाडे आणि वनझाडांची कत्तल करण्यात येणार असून, शेतीसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या २१९ विहिरी व २१ तलाव बुजविले जाणार असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार असून, हजारो घरे व बांधकामे देखील कायमस्वरुपी बाधित होणार आहेत तसेच जलस्त्रोत नष्ट होणार असून बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना अत्यंत तुटपुंजा मोबदला दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डहाणू आणि पालघर तालुक्यातील 'हरितपट्टा' तसेच मिरची आणि सिमला मिरची उत्पादनात अग्रेसर असलेल्या सुपीक जमिनीचे या प्रकल्पामुळे नुकसान होणार असून, वरोर, चिंचणी, वाणगाव, नेवाळे, शिगाव यांसह २२ हून अधिक गावांचा नैसर्गिक समतोल या प्रकल्पामुळे पूर्णपणे कोलमडणार असल्याची भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली असून त्याबाबत 'समर्थन' या समाजिक संस्थेने शासनाकडे दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाढवण बंदराला थेट जोडण्यासाठी जेएनपीए आणि महाराष्ट्र सागरी मंडळाकडून वाढवण येथे देशातील सर्वात मोठं बंदर उभारण्यात येत असून अनेक आदिवासी, शेतकरी, मच्छीमार रहात असून सदर हरित महामार्ग प्रकल्पामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई प्रकल्पग्रस्ताना तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि वृक्षतोड कमी करण्यासाठी शासन या महामार्गाच्या सरेखनाचा (Alignment) पुनर्विचार करणार आहे काय, तसेच, निसर्गसंपदेचा होणारा हा ऱ्हास रोखण्यासाठी तातडीने काय उपाययोजना केल्या जात आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१), (२), (३) व (४) वाढवण बंदराला जोडणारा वाढवण ते तवा या Greenfield महामार्गाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अहवालानुसार या प्रकल्पासाठी एकूण ६०६.५४ हेक्टर भूसंपदानाची आवश्यकता आहे. सदर प्रकल्पासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अंतर्गत भूसंपादन

करण्यात येत असून जमिनीची भरपाई भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना हक्क अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार परिगणित करण्यात येणार आहे.

सदर महामार्ग पालघर तालुक्यातील नेवाळे, राणीशिगांव, हनुमाननगर, शिगांव, खुताड, सुमडी, गारगाव, चिंचोरे, रावते, आकोली, आकेगव्हाण, नानीवली, आंबेदे व बोईसर या १४ गावांमधून जात आहे. तसेच डहाणू तालुक्यातील वरोर, चिंचणी, तणाशी, बावडे, कोलवली, वाणगाव, धमाटणे, घोळ, तवा व कोल्हाण या १० गावांमधून जात आहे.

सक्षम प्राधिकारी, ग्रीनफिल्ड महामार्ग (वाढवण बंदर) प्रकल्प तथा उपजिल्हाधिकारी यांनी घोषित केलेल्या निवाड्यानुसार आज अखेर रुपये १९१६.२३ कोटी भरपाई अदा करण्यात आली असून मोबदला वितरणाची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(५) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अहवालानुसार प्रस्तुत महामार्गाच्या संरेखनेबाबत सचिव, रस्ते वाहतूक व महामार्ग यांच्या अध्यक्षतेखालील Alignment Approval Committee (AAC) ने उपलब्ध पर्यायातून निसर्गसंपदेचा कमीत कमी ऱ्हास होणाऱ्या संरेखनेस (Alignment) मंजूरी दिलेली आहे. या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यात आली असून कार्यादेश प्रदान करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकल्पासाठी पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने (MoEFCC) दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ रोजी पर्यावरण व CRZ मंजुरी दिली आहे.

सदर प्रकल्पासाठी वनसंवर्धन कायदा १९८० च्या तरतुदीनुसार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने २३७.०८६ हेक्टर वनजमीन वळविण्याच्या पहिल्या टप्प्यासाठी पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने (MoEFCC) मंजुरी दिली आहे. प्रकल्पाकरीता वळविण्यात येणाऱ्या २३७.०८६ हेक्टर जमिनीच्या बदल्यात प्रतिपूरक वनीकरण (Compensatory Afforestation) करण्यासाठी ४७४.१७ हेक्टर जमीन निश्चित करण्यात आली असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

कांदळवन बाधित होणाऱ्या ९.२४९८ हेक्टर क्षेत्राच्या भरपाईसाठी अंदाजे ३० हेक्टर क्षेत्रावर कांदळवन लागवड व त्यांची १० वर्ष देखभाल करण्यासाठी आवश्यक निधी Mangroves Division कडे जमा करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत पहिल्या टप्प्याच्या मंजुरीच्या अनुषंगाने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणांमार्फत वनविभागाकडे रुपये १४६.२२ कोटी निधी जमा करण्यात आलेला आहे.

या व्यतिरीक्त या परिसरातील हरित आच्छादन वाढविण्यासाठी तसेच पर्यावरणीय संतुलनासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रकल्प मार्गालगत व मध्य विभाजकात (Median) सुमारे ७१,००० वृक्षांची लागवड करणे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.